A. 7.1

1.One Day National Seminar on Biodiversity

2. Deshbhakta Magazine 2018-19

## One day National Seminar on Biodiversity and Its Conservation on Dated October 16, 2018

Department of Zoology organised One day National Seminar on 16th October 2018, on Biodiversity and its Conservation. The Chief Patron of this Seminar was Dr. Mrunalini Fadnavis (VC Solapur University), Mr. Pratapsinh Garad (Secretory, Deshbhakta Sambhajirao Garad Mahavidhyalaya, Mohol), Mr. Pravinsinh Garad (Treasurer, Deshbhakta Sambhajirao Garad Mahavidhyalaya, Mohol), Dr. Chandrashekhar Hiware (Ex. Director, Directorate of Sericulture Maharashtra and Head Dept. of Zoology Dr. B. A. M. University, Aurangabad), Dr. Aabasaheb Deshmukh (Prin. Shankarrao Mohite Mahavidhyalaya Akluj), Dr. Ubale V.P (Dean Science Faculty Solapur University), Dr. K. R. Rao (Chairman BOS Solapur University), Mr. Mali S.N (Divisional Forest Officer, Solapur) and Dr. Tikte D.S ( Principal D. S. Garad College, Mohol).

For this Seminar the Key note is addressed by **Dr. C.J.Hiware** (Ex. Director, Directorate of Sericulture Maharashtra and Head Dept. of Zoology Dr. B. A. M. University, Aurangabad) and the Speakers are **Dr. Varad Giri** (Herpatologiest, Conservationist and Former Curator and Deputy Director BNHS Mumbai), **Dr. Vinayak Dhulap** (Director of School of Earth Sciences Solapur University Solapur), **Dr. Hippargi Rajshekhar**( Walchand College Solapur). For this function 52 research papers were presented as poster, Wild Life Photography Competation was conducted 32 particepents were Particepeted.Nearly 360 Particepents were Particepeted in this seminar.


1. Organized One day National Seminar on Biodiversity and Its Conservation on Dated October 16, 2018




**Inauguration by Dr. Mrunalini Fadnavis Madam**



Theme and Purpose of seminar is concluded by Convener Dr. Shinde Kishor




**Lecture delivered by Dr. Varad Giri sir (Senior Scientist BNHS Mumbai)**



**Hands behind Grand Success of National Seminar**

# ‘ देशभक्त ’

## देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ.



स्व.डॉ.वसंतराव बाबुराव गरड



कै. देशभक्त संभाजीराव गरड



सन - २०१८-२०१९



मा.प्रतापसिंह वसंतराव गरड
सचिव
देशभक्त संभाजीराव गरड बहुउद्देशिय व संशोधन संस्था
मोहोळ



मा.प्रविणसिंह वसंतराव गरड
खजिनदार
देशभक्त संभाजीराव गरड बहुउद्देशिय व संशोधन संस्था
मोहोळ



डॉ. डी. एस. तिकटे
प्राचार्य
देशभक्त संभाजीराव गरड बहुउद्देशिय व संशोधन संस्था
मोहोळ



डॉ. पवार व्हि,.टी
इडिटर
देशभक्त संभाजीराव गरड बहुउद्देशिय व संशोधन संस्था
मोहोळ

## ❊ देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ ❊

## सोलापूर विद्यापीठ

## ❊ देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ ❊

## ❊ सोलापूर विद्यापीठ गीत ❊

ज्ञानरूप देव धर्म जीवनी असो
करूणेचा अमृतघन या मनी वसो ।।धु।।

अध्ययनसमृध्द होऊ ध्यास धरोनी
श्रमसंस्कृती वाढवूया यत्न करोनी
ज्ञानकला विज्ञान ध्वजा ही अंबरी विलसो ।। १ ।।.

धर्म जात पंथभेद जाऊ विसरूनी
पतितांना कळवूया धीर देऊनी
अश्रुंना हसवू ही आस नित ठसे ।।२।।

सानथोर उच्चनीच ही सरो निशा
ज्ञानसूर्य उगवुनिया उजळू दे दिशा
प्रगतीचा पथ सात्विक लोचणी दिसो ।।३।।

# * नियतकालकिच्या स्वामित्वाबद्दल निवेदन *

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | :- | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय ,मोहोळ |
| प्रकाशन काळ | :- | वार्षिक |
| प्रकाशक | :- | प्राचार्य- डॉ.श्री. डी.एस.तिकटे |
| राष्ट्रीयत्व | :- | भारतीय |
| पत्ता | :- | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, कुरूलरोड,मोहोळ |
| मुद्रक | :- | स्वामी समर्थ ग्राफिक्स |
| राष्ट्रीयत्व | :- | भारतीय |
| नियतकालिकाची मालकी | :- | देशभक्त संभाजीराव गरड बहुउद्देशिय व संशोधन संस्थेचे देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ |

या अंकातील सर्व मतांशी संपादक मंडळ सहमत असतील असे नाही

डॉ. पवार व्ही, आर
संपादक

प्रा.डॉ.डी.एस.तिकटे
प्राचार्य
प्रकाशक,दे.सं.गरड महाविद्यालय.
मोहोळ,

## ⁂ ब्रीद वाक्य ⁂

।। तमसो मा ज्योतिर्गमय ।।

## ⁂ ध्येय ⁂

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली करून त्यांना आपल्या प्रगतीसाठी आत्मनिर्भर,चरित्रवान, निर्व्यसनी व सर्वतोपरी सक्षम बनविणे.

## ⁂उदिष्ट⁂

- केजी टू पीजी शिक्षण एकाच शिक्षा संकुलात उपलब्ध करून देणे.
- क्रिडा संस्कृतिच्या बळकटीकरणासाठी अद्यावत क्रीडांगण व संशोधनावरती जास्त भर व त्यासाठी पोषक ,सहाय्यक साधनसामुग्री व
- वातावरणाच्या उपलब्धतेस प्राथमिकता देणे.
  विद्यार्थिनींसाठी सर्व सोयींनी युक्त होस्टेल उपलब्ध करून देणे

## ❖ महाविद्यालय विकास समिती ❖

| क्र.न. | विकास समिती सदस्यांचे नावे | पद |
| --- | --- | --- |
| १) | मा.श्री. प्रतापसिंह वसंतराव गरड | चेअरमन |
| २) | मा.श्री. प्रविणसिंह वसंतराव गरड | संस्था सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शिकरे दत्तात्रय सुभाष | सचिव |
| ४) | मा.श्री.जोशी बी.एल | स्थानिक सदस्य शिक्षण विभाग |
| ५) | मा.श्री.अनिल दत्तात्रय कळकी | स्थानिक सदस्य उद्योग विभाग |
| ६) | डॉ.मुळाणी एस.एस. | स्थानिक सदस्य संशोधन विभाग |
| ७) | सौ. आश्लेषा कैलास कांचन | स्थानिक सदस्य सामाजिक विभाग |
| ८) | श्री. कुदळे चंद्रशेखर भाऊसाहेब | प्राचार्य नियुक्त विभाग प्रमुख |
| ९) | प्रा. माने आर.व्ही | शिक्षक प्रतिनिधी |
| १०) | डॉ. मोरे एस.टी | शिक्षक प्रतिनिधी |
| ११) | सौ.कडले यु.एल | शिक्षक प्रतिनिधी |
| १२) | श्री.कडले ए.एल | शिक्षकेतर प्रतिनिधी |
| १३) | श्री. बनारे ए.बी | नॅक समन्वयक |
| १४) | कुमारी प्रगती प्रभाकर | विद्यार्थी मंडळ सचिव |
| १५) | श्री. | विद्यार्थी मंडळ अध्यक्ष |

## ❖ शालेय व्यवस्थापन समिती ❖

| अ.क्र. | नाव | पद |
| --- | --- | --- |
| १ | मा.श्री. प्रतापसिंह वसंतराव गरड | चेअरमन |
| २ | मा.श्री. प्रविणसिंह वसंतराव गरड | सदस्य |
| ३ | मा.श्री. डॉ. दत्तात्रय सुभाष शिकरे | सचिव |
| ४ | मा.श्री. प्रदिप रामचंद्र काकडे | सदस्य |
| ५ | मा.श्री. प्रा.चंद्रकांत वामनराव देवकते | सदस्य |
| ६ | मा.श्री. प्रा.एल.बी. जाधव | सदस्य |
| ७ | मा.श्री. नागनाथ भागवत गायकवाड | सदस्य |

# ❊ प्राध्यापक ❊

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा.श्री. प्रा. डॉ. तिकटे डी.एस (M.A.Ph.D) | प्राचार्य |
| २. | मा.श्री. प्रा.जाधव बी.एम (M.A.B.Ed) | इतिहास |
| ३. | मा.श्री. प्रा. माने आर.व्ही (M.A.B.Ed) | अर्थशास्त्र |
| ४. | मा.श्री. प्रा. कुदळे सी.बी. (M.A.) | इंग्रजी |
| ५. | मा.सौ. प्रा. जाधव वाय.के M.A(M.Phil) | मराठी |
| ६. | मा.श्री. प्रा. देशपांडे एन.के (M.PEd) | शा.शिक्षण |
| ७. | मा.श्री. प्रा. डॉ.मुलाणी एस.एम M.A(Ph.D) | भूगोल |
| ८. | मा.श्री. प्रा. काळे एस.एस (M.A.B.Ed) | इतिहास |
| ९. | मा.श्री. डॉ. पाटील एन.जे M.A(M.Phil.) | भूगोल |
| १०. | मा.श्री. डॉ. शिंदे डी.जी M.A(M.Phil.) | भूगोल |
| ११. | मा.श्री. प्रा. शिंदे बी.एस (M.A.) | हिंदी |
| १२. | मा.श्री. प्रा.पटेल ए.बी (M.com B.Lip) | ग्रंथपाल |
| १३. | मा.श्री. प्रा. सोनवले आर. आर(M.A.NET) | मराठी |
| १४. | मा.श्री. प्रा. बनाटे ए.बी (M.A.NET) | इंग्रजी (संशोधन कार्य २०१७-१८) |
| १५. | मा.श्री. प्रा. काळे यु.एन (M.com,M Phil.NET) | वाणिज्य |
| १६. | मा.श्री. डॉ. खाडे ए.टी. (M.A.NET,SET) | अर्थशास्त्र |
| १७. | मा.श्री. डॉ. मोरे एस.टी (M.com NET) | वाणिज्य |
| १८. | मा.श्री. प्रा. दुधाळ एस.सी (M.com NET) | अकाउंटन्सी |
| १९. | मा.श्री. डॉ. पवार व्ही. आर M.A(M.Phil, NET, SET) | हिंदी |
| २०. | मा.श्री. गायकवाह एस.एस M.A(NET, SET) | मराठी |
| २१. | मा.श्री.लवटे व्ही.पी M.A(NET, SET) | राज्यशास्त्र |
| २२. | मा.श्री. जगताप एस.एस M.A(NET) | मराठी |

# संपादकीय

महाविद्यालयीन शिक्षण म्हणजे विद्यार्थी दशेतील सर्वोत्तम जडघडणीचा सामर्थ्यशील, कलावान व सर्वोतोपरी संपन्नतेचा काळ विद्यार्थ्यांचा या गुणांना विकसित करण्यासाठी व त्यांच्या अभिव्यक्तिसाठी सशक्त माध्यम उपलब्ध करून देण्यासाठीच महाविद्यालयीन नियतकालीकांची योजना केलेली आहे. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांमध्ये लेखनाचे सामर्थ्य निर्माण होण्यासाठी व भविष्यातील सशक्त लेखक कवी कलाकार निर्मित व्हावेत, गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व्हावे, प्रेरणा मिळावी तसेच महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचा परिचय व्हावा, त्यांचा सहभाग वाढावा हा या नियतकालिकाच्या निमिर्तीचा हेतू आहे.

या वार्षिक अंकाचे संपादन कार्य करील असताना कॉलेजचे प्राचार्य डॉ. डी.एस तिकटे यांचे अनमोल मार्गदर्शन व प्रेरणा मिळावि तसेच इतर अनेक प्राध्यापकांचे आशिर्वाद व सहकार्य लाभले आहे. या सर्वांचा मी ऋणी आहे. हा अंक सुव्यवस्थित स्वरूपात टंकित व प्रकाशित करणारे यांचे सहकार्य लाभले त्यांचे आभार अहवालातील त्रुटी व उणीवा आपण सुज्ञ वाचक समजून घ्याल असा आशावाद व्यक्त करतो.
परमपूज्यणीय डॉ . वंसतरावजी गरड यांच्या स्मृतीस सादर अर्पण.......



डॉ. पवार व्ही, आर
संपादक

## ※ जगणं ※

शितल पांडूरंग गुरव
(बी.कॉम-भाग-३)

चालता चालता कधीतरी
ठेच लागणारच
जागयचं म्हटल्यावर
दु:ख ही असणारचं
ठेच लागणार म्हणून
चालायचं का सोडायचं !

दु:ख आहे म्हणून
का जगायच सोडायचं !
दु:खातही आनंदाला
कुठेतरी शोधायच
आतून रडतानाही
दुसऱ्याला हसवायंच
प्रत्येक क्षणाची
हसरी फुले करून टाकायचं
अरे ! यालाच तर जगणं म्हणायचं...



## ※ जीवनातील क्षण ※

शितल पांडूरंग गुरव
(बी.कॉम-भाग-३)

आठवल्या त्या आठवणी
आठवले ते क्षण
आठवून ते दिवस
येते डोळ्यातून पानी
काल होता पण आज नाही
जीवनात माझ्या रस

गरिबीत जन्माला आले
हा माझा गुन्हा नाही
पण गरीबीत जन्म घेऊन
गरीबच राहणे हा माझा
खुप मोठा गुन्हा आहे.



जीवनात काही अर्थ नाही
सांगून काही फायदा नाही
शिक्षणाशिवाय पर्याय नाही
तरच हे दिवस जाणार आहेत.
मनाला शांती लाभणारे आहे
जीवनात अर्थ राहणार आहे.

## * महिला उद्योजकांची समस्या व त्यावरील उपाय *

मोनाली देशमुख,हर्षदा इंगळे
मार्गदर्शन- प्रा.डॉ.मोरे एस.टी
(बी.कॉम.भाग-२)

प्रस्तावना :-

महिला उद्योजकाच्या समस्या व उपाययोजनेसंदर्भातील कारण ग्रामीण भागामध्ये पारंपारिक उद्योगात
महिलांचा समावेश असतो.परंतु अशा समस्यांना सामोरे जावे लागते ग्रामीण भागातील महिला उद्योजकास असलेल्या संधीचा अभ्यास करून उद् भवणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना याकरिता हा लेख प्रसिद्ध करीत आहोत.जेणेकरून महिला ग्रामीण भागातील जास्तीत जास्त महिला उद्योजक तयार होतील असे वाटते.


या पत्रलेखनाचा उद्देश हा ग्रामीण महिला उद्योजकाच्या समस्या जाणून त्यावर उपाययोजना सुचविणे हा होय.

महिला उद्योजकाची ओलख :-

महिला उद्योजक म्हणजे एखादी महिला किंवा महिलांच्या समूहास करावे लागणारे विशिष्ट कार्य ज्यामध्ये व्यवहार संघटन व्यवस्थापन धाडस आणि नफा या गोष्टीचा समावेश असतो अशा महिला अुवा महिलांच्या समूहास उदयोजक असे म्हणतात.

ज्या उदयोगामध्ये भांडवल आणि रोजगार या दोन गोष्टीमध्ये महिलांचा सहभाग असतो. अशा सहभागास महिला उदयोजक असे म्हणतात.थोडक्यात महिला उदयोजक ही एक अशी व्यक्ती की जी विशिठ कार्याच्या हेतूने नफा प्राप्तीसाठी उत्पादन व सेवा यांची निर्मिती करून ते गरजू लोकांच्या पर्यंत पोहचविते.

महिला उद्योजकास उद्भवणाऱ्या समस्या :-






१. आर्थिक समस्या :-

महिला उदयोजकास उद्भवणाऱ्या समस्यापअकी ही एक अत्यंत महत्त्वाची समस्या होय. उदयोजक व्यवसायाचा आवश्यक असणारे प्रचंड भांडवल बँका व वित्तीय संस्थाकडून कर्ज स्वरूपामध्ये घ्यावे लागते परंतु बँका व वित्तीय संस्थाच्या अकार्यक्षम व उदासिनतेमुळे महिला उदयोजकांना वित्तीय सहाय्य सहजासहजी उपलब्ध होत नाही.

२. अपुरा कच्चामाल :

उत्पादनासाठी पैशाबरोबर कच्चामालाची पुरेशा प्रमाणात उपलब्धता असणे आवश्यक होय.महिला उदयोजकांना आवश्यक असणारा कच्चामाल योग्य प्रमाणात योग्यवेळी आणियोग्य किमतीत उपलब्ध होण्यास अडचण येते आणि यामुळे मागणीनुसार वस्तूची निर्मिती करण्यास अडचण येते.

३. मर्यादित उत्पादन साधणे :

कोणत्याही उदयोगास आवश्यक असणारे घटक म्हणजे पैसा,मनुष्यबळ, यंत्रसामग्री,तत्रज्ञान, कार्यपध्दत आणि पायाभूत सुविधा या गोष्टी महत्त्वपूर्ण मानल्या जातात महिला उदयोजकांना उत्पादनास आवश्यक असणाऱ्या मर्यादित साधनामुळे आणि उत्पादनावर आवश्यक समजले जाणारे विपणन कौशल्य याचा अभाव असल्याने व्यवसायचा विकास होत नाही.

४. शिक्षणाचा अभाव :

महिला उदयोजकामध्ये आवश्यक असणारे पुरेशा प्रमाणातले शिक्षण याची कमतरता असल्याने व्यवसायाचा विस्तार -विकास करणे समस्याकारक होते.शिक्षण म्हणजे आधुनिक पद्धतीने उत्पादन करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य होये.

५. पुरूषप्रधान संस्कृती :

आपल्या देशामध्ये आजही जुन्या रूढी-परंपरा या गोष्टींचा दैनदिन जीवनामध्ये वापर केला जातो समाजातील पुरूष आणि महिला या दोन घटकामध्ये तफावत ठेवण्यात आली आहे.

६. जोखीम स्वीकारण्याची क्षमता :

बहुतांश महिला या अपाल्या घरकामध्ये व्यस्त असतात.उदयोग -व्यवसायातील असलेली जोखीम स्वीकारण्यात अनेक समस्या निर्माण होतात. केवल कुटुंब व कुटुंबातील सदस्यांचे पालनपोषण या कारणामुले उदयोगातील जोखीम स्वीकारता येत नाही.

७. जागतिक स्पर्धा :

आजच्या आधुनिक जागतिक स्पर्धेमध्ये आपल्या देशातील महिलांना आपला उदयोग टिकवून ठेवण्याचे मों आव्हान मानले जाते.महिला उदयोजकामार्फत पारंपारिक साधनांचा वापर करून व्यवसाय चालविण्यात येतो. परंतु जागतिक धोरणामुले ईीर देशातील उदयोग व्यवसायासमोर स्पर्धा करण्यास

## हरवलेल प्रेम

श्री.जाधव टी.डी
(मृदा शास्त्र विभाग)



विचार करायला हवा होतास मला सोडून जाताना
जायचंच होतं तर अधीच विचार करायला हवा होतास
माझ्या आयुष्यात येताना
तुला काहीच कसं वाटलं नाही
मला आय लव्ह यू म्हणताना
तुझ्या कंठातून शब्दच कसे बाहेर पडले
मला विसरून जा म्हणताना
मन माझं भरून आलं होतं
मि तुझ्याशिवाय जगू शकत नाही असं तु
मला म्हणताना
आज काळीज फाटलं माझ्यासमोर तुझा हात दुसऱ्याच्या
हातात बघताना
कसं जगायचं मी तु माझ्यासोबत नसताना आणि का करायची अपेक्षा
फुलाची आयुष्य सगळं काट्याकुट्यानं भरलेलं असताना
मला जगाला खोटं बोलावं लागलं तुला एकांतात भेटताना.
आज त्यांचाच विश्वास उडला असेल तुला मला
वेगळं झालेल बघताना
दहा हत्तींचं बळ आणि प्रेम पण गुरसेल
असल्यासारखं वाटायचं तू सोबत असताना
आज पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे अवस्था
झालीय तुला दुसऱ्या कोणाची झालेली बघतांना





## मी प्रेम केलं

श्री.जाधव टी.डी
(मृदा शास्त्र विभाग)



मी प्रेम केलं
तुझ्या कोमल हळव्या मनावर
लोभस निरागस चेहऱ्यावर
तुझ्या मनमुराद हसण्यावर आणि
तुझ्या बेधर नेत्रावर
.........मी प्रेम केलं

मी सांगण्या आधीच माझ्या मनातलं
ओळखणाऱ्या तुझ्या मनकवड्या स्वभावर
मनात खूप काही असताना तोंडून नाही तर
चेहऱ्यावर भाव उमटवणाऱ्या तुझ्या चेहऱ्यावर
..............मी प्रेम केलं

तुझ्या सुंदर दिसण्यावर नाही तर तुझ्या सुंदर
असण्यावर
मनातलं दु:ख न सांगता हसुन ते लपवण्यावर
प्रत्येक कडू गोड आठवणीत सावलीसारखं माझ्यासोबत
राहण्यावर...............मी प्रेम केलं

तुझ्या छोट्या मनावर सर्व काही मिळूनसुद्धा तुझ्या
छोट्या - छोट्या रुसण्यावर...............मी प्रेम केलं



तुला प्रत्येकक्षण कोणाच्यात तरी आनंद बघतोस
पण तू माझ्या आनंदात तुझा आनंद बघीत
राहण्यावर ..............मी प्रेम केलं

## कॉलेज लाईफ आणि अभ्यास

भोसले कल्याणी राजेंद्र
(बि.कॉम-I)

कॉलेजचे दिवस एवढे चार्मिंग,एनर्जिक,एक्साईड,टिंग, रोमॅंटीक आणि थ्रिलिंग असताना एक तुफान ववंडर माजवत आणि सगळं उध्वस्त करून जातो तो म्हणजे रिझल्ट परंतु ज्याप्रमाणे अपयश पचविणे कठीण त्याचप्रमाणे यशाने हुरळून जाणारेही असतात.यशाबरोबर मिळणारी किर्ती ही आपल्याला आपोआपच जमिनीपासून दोन बोटं वर नेण्याचे काम करते अपयशामुळे आपण फक्त रडत बसतो तर जग हे लक्षात घ्यायला पाहिजे की निसर्गाने मला हे एकच आयुष्य दिलं आहे ते क्षणाक्षणाने कमी होत आहे.यश आणि अपयश मला हवं एकाच आयुष्यात मिळवायचं आहे.आयुष्याचे असे क्षण जाता-जाता एक दिवस आपले आयुष्य पूर्णपणे संपणार आहे.आपण नेहमी विचार करतो की मला खूप अभ्यास करू चांगले मार्क्स पाडू परंतु आपण फक्त विचारच करतो कृती मात्र करत नाही.कारण अंथरूणावर पडल्या-पडल्या स्वप्ने बघीतल्याने काय यशस्वी होणार ? यश मिळविण्याचे जगातील सर्वात उत्तम आणि एकमेव तंत्र म्हणजे शिस्तबद्ध विचार व त्याचप्रमाणे काम करू शकणारे मन आणि स्वतःवर नियंत्रण घालुन कसोशीने पाळणारा दृष्टीकोन !



अभ्यास आणि स्पर्धा माणसाच्या शारीरीक, मानसिक आणि बौध्दिक व वैचारिक कुवतीला सतत आव्हान देत असते खऱ्या हुशारीची मेहनतीची आणि कल्पकतेची कोठेही कदर केली जाते. अभ्यास म्हणजे ज्ञान मिळविणे आणि स्वतःहून मिळवणं जे दुसऱ्याकडून ते विशिष्ट चाकोरी-बाहेर जाऊन विचार करू शकत नाही. जे स्वतंत्ररित्या अभ्यास करायला लागतात, त्यानांच प्रश्न पडतात प्रश्नामधून पुन्हा विचार करायला त्यामुळेच त्यांना त्यचा सतत विकास होतो. दुर्दैवाने आज स्वयं अध्ययनाची परंपरा लोप पावत चालली आहे. परीक्षेसाठी सोडून जीवनात अभ्यासाची गरज असते. हेच आपण विसरत चाललो आहोत. अभ्यासातून परिपूर्णता येते ती अधिक अभ्यासाला प्रवृत्त करते अभ्यासातून ज्ञान मिळते आणि या ज्ञानाच्या सरणीतून आपण मानसिक शांतीकडे जातो. आणि ही शांती मनाची अधिक पूर्णपणे अवस्था असते हे विवेकानंदाच्या उदाहरणावरून आपल्याला लक्षात येईल.आधुनिकतेचा ज्वर आपल्यामध्ये एवढा चढला आहे की, तो दिवस दूर नाही जेव्हा मुलगा आलेल्या आई-वडिलांच्या तेरवीची केपार्टी देईल या आधुनिक जगात मार्केटिंच्या जोरावर आलेल्या मनावर



विशिष्ट वस्तूंचे आकर्षण निर्माण केले जाते परंतु आपल्याला एखाद्या वस्तूबद्दल तोपर्यंत आकर्षण राहते जोपर्यंत ती वस्तू आपल्याला मिळत नाही ती मिळवल्यानंतर आकर्षण संपुष्टात येते.

एक विद्यार्थी म्हणू प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या भोवताली घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा,दुर्घटनेचा सामाजिक कार्याचा विकासाच किंवा राजकारणाचा शास्त्रशुध्द पध्दतीने विचार आवश्यक आहे.जेणेकरून एक अष्टपैलू व्यक्तिमत्व निर्माण होऊ शकेल.आपल्या हातांच्या रेषावर आपले भविष्य अवलंबून असू शकत नाही.कारण भविष्य त्यांचे सुध्दा उत्तम घडते ज्यांना हातच नाहीत.

वर्तमानात जगताना आपण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की कालचा दिवस जरी आपल्याला खूप काही शिकवून गेला हे खरं असलं तर मी जे करील त्यावर माझा उद्याचा दिवस



## ❀ पाऊस ❀

उघडे ज्योती भास्कर
(बि.कॉम- भाग-१)

थेंब थेंब त्या पाऊसात
अंग झाले ओले चिंब
आभाळातील वहुमोलाचा थेंब पाण्याचा
चिंब चिंब होऊन नाचू या !



मातीमधूनी पिकते मोती
सारे आनंद घेऊ या
थेंब थेंब त्या पाण्यात सारे
शेत हिरवे गार करू या

पिकल्या शेतामधी गाणी गाऊ या
सारे ओले चिंब होऊ या
मोती बनूनी येती पाऊस
वर्षेनपल्या सरीतूनी

पाना-फुलांचे पाते
थेंबाथेंबानी सजवू या
हिरव्या सृष्टीच्या मळ्यात गाणे गाऊ या
थेंब थेंब त्या पाऊसात ओले चिंब होऊ या

पाऊसामध्ये आनंद घेऊ या
आभाळामध्ये इंद्रधनुष्य पाहू या
सात रंगानी सजला इंद्रधनुष्य
सगळे झाले आनंद



थेंब थेंब त्या पाऊसात
ओले चिंब होऊ या
रिमझिम पाऊसात गाणे गाऊ या !




## ❀ आई बाबा ❀

कु.रणदिवे प्रिया
(बी.कॉम- भाग-१)

आयुष्यात अनेक संकटे आली की
पहिली तुमची आठवण येते
कितीही दुर गेले तरी तुमच्याविना मला करमतचं नव्हते
का कुणास ठाऊक आठवण आली की डोळ्यात पाणी येईल
माझे पुरविलेले लाड माझ्यावरचे प्रेम माया आणि विश्वास
हे सतत डोळ्यासमोर येईचे
विश्वास हे सतत डोळ्यासमोर येईचे
लहानपणापासून जपलं लाडानं मोठ केलं पण
तुम्ही सांगा आईबाबा
आपल्या लेकीला परक्याच्या घरी का पाठवलं
पाहवसं वाटलं की फक्त आठवण काढते
पोट भरून बोलुन डोळे भरून अश्रू सांडते आईबाबा
तुम्हीविना कधी राहावतचं नव्हते
तुम्हाला सोडून जाताना डोळे कधी भरून आले
कळलंच नाही
आता लाडाने तुम्ही कधी हाक मारणार याचीच
लावला जीव आईबाबा तुम्ही मला
तुमच्याविना कधीच करमलं चिमणी जरी उडून दुर गेली
शेवट पर्यंत फक्त नि फक्त आईबाबा तुम्हीच
त्या चिमणीचे सारे जग हाई





## मैत्री

उपाडे ज्योती भास्कर
(बी.कॉम- भाग-१)

छोटस फुल कधी फुललं समजलंच नाही
विश्वास,प्रेम हे एकत्र कसे आले समजलंच नाही
आपुलकी ,भावना इतकी होती की मैत्री कधी झाली
समजलंच नाही
हसलो,खेळलो आणि रडलो ही पण मैत्री
दुःखातही साथ दिली सुखातही वाट दाखवली पण मैत्री
कधीच नाही विसरली



फुलाप्रमाणे फुलली मनापासून जपली मैत्री ही अशी
होती ती कधीच नाही तुटली
जाईप्रमाणे खिलली रेशमी धाग्याप्रमाणे नाजूक बनली
पण मैत्रीत तावदं कुठेच कधी नाही पडली
मैत्री हे एक नातं आहे
आयुष्यभर टिकणार आहे सुंगधाप्रमाणे ते
दरवळत राहणार आहे
कितीही संकटे आली तरी ते नातं कधीच एकटे
पडणार नाही.
आपुलकीची आस लागली
विश्वासाने साथ दिली
शेवटी आयुष्याची सांज संपली
तरीही मैत्री कधीचंमाही विसरली फक्त ती फक्त
शेवटी मैत्रीची किंमत कळली



## अशी एक मैत्रीण असावी

कु.शिंदे मृणाली सुखदेव
(बी.कॉम भाग-१)

आपल्याला एक मैत्रीण असावी !
समोर असो की,थोडीशी हुरहुरावी
बोलली नाही तरी आपल्याकडे बघून गोड हसावी
चालता चालताच पाहून तिनं हाक मारावी
पर जवळ येताच पुढे निघून जावी
आपण नसलं की थोडीशी हिरमुसावी
दिसली की,गालावर छान खळी पडावी
कधी हसता हसताच खुदकन हसावी
हळूच आपल्यावर रागवावी
मग काही न बोलताच निघून जावी,
नंतर चुक कळल्यावर मात्र फुगून तो रुद्र रुसावी
सकाळी भेटल्यावर हियचिखाच बोलावी
निरागस चेहऱ्याने मन माझी भरावी
ती आनंदात असली की पटपट बोलावी
नाहीतर थोडीशी अबोल रहावी
सुखात सगळ्यांना सामील करावी
दुःख फक्त माझ्याशीच बोलावी
बाहेरगावी कुठे गेलो तर तिने आठवण यावी
आठवण काढताच तिला मात्र उचकी लागावी
परत आल्यावर हसतानाही डोळ्यात पाणी भरावी
साधा एक फोनही केला नाही.म्हणत रुसून बसावी
थोडा वेळ मग ती शांत रहावी
पुढच्या क्षणाला माझ्यासाठी काय आणले ?
म्हणून विचारावी
ती कायम असावी की आधार वाटावी
आपल्याला पण एक मैत्रीण असावी
आपल्याला पण एक मैत्रीण असावी





## ❁ आई मला जन्म घेऊ दे ❁

कु. भोसले मंजुषा भारत
(मी.सीम.भाग-१)

आई ! मला जन्म घेऊ दे !
तु जसे पाहिले जग मला देखील पाहु दे ॥
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे !
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याची जागी तु आहेस असे तुला वाटत नाही
ताईसारं माझ्या मला आनंदाने न्हाऊ दे ॥
दादा असतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो का?
ज्ञान तुझ्या सारखे म्हणून असा आटतो का?
राखीसाठी मिठून दादाच्या मला होऊ दे !
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे !
तु महिला तु कन्या तु एक स्त्री आहे
काल ति तु होती आज ति मी आहे
तु जसे शिकले माते तसे मला शिकू दे !
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ॥
पहा मन शिकून मी तुम्हा देणार नाही
भाव कन्यादानाचे दोघांनाही मिळणार नाही
ढोके घेता भरून तुझे पदर मला होऊ दे !
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ॥



## ❁ कुटुंब ❁



डोक्यावर आशिर्वादाचा
हात ठेवणारे तेच माझे
आजी-आजोबा
आयुष्यामध्ये आधार
माझा तेच माझे बाबा
जगण्याचा विश्वास माझा
तेच माझा दादा
माया लावून आदर देणारी
तिच माझी आई
जीवनामध्ये सर्वात जास्त प्रेम
करणारी तिच माझी ताई
सर्वांना बांधून ठेवणारी
सर्वांना आधार देणारी
संकटाच्या वेळी मदत करणारी
हिच तर माझी फॅमिली




## ❁ मुलीचं आयुष्य ❁

ज्या घरामध्ये खेळून मोठ व्हायचं असत
त्याच घराला सोडून जायचं असत
ज्या वडिलांच्या खांद्यावर खेळून मोठ व्हायचं असत
त्याच खांद्यावर डोक ठेवून जाताना रडायचं असत
ज्या बहिण-भावडांना पाहून रडायाच असत
त्यांनाच सोडून जाताना रडायच असत
ज्या आईच्या बोटाला धरून चालायला
शिकायच असत त्याच बोटान कुंकू लावून निघायचं असतं
ज्या मैत्रीणीसोबत जीवन घालवायच असत त्यांनाच
कुरवाळी म्हणून सोबत न्यायच असतं
सुख तुझं माझं आणि माझं सेवच असतं



## ❁ आयुष्य ❁

कळसाच्या मतीने का होईना
पण रोज थोडी थोडी प्रगती करा
खुप सारे येतील आडवे
बसं त्यांना हरवायची हिम्मत ठेवा
जर तुम्हाला तुमची
श्रीमंती मोजायची असेल
तर नोटा मोजू नका
कधी चुकून
डोळ्यात दोन अश्रू आले तर ते
पुसायला किती जण येतात
ते मोजा....!
मी माझ्या आयुष्यात प्रत्येक व्यक्तिला किंमत देते
कारण जे चांगले आहेत ते साथ देतील व जे
वाईट असतील ते अनुभव देतील...



## Indian Army

[illegible]





## ❀ असं वागावं ❀

आशा मोहन जगताप

संकटाना कधी घाबरायचं नसतं
त्याला सामोरं जायचं असतं
कुणी नाव ठेवली तर थांबायचं नसतं
आपलं काम चांगलंच करायचं असतं
अपमानानं कधी खचायचं नसतं
जिद्दीनं बळ वाढवायचं असतं
निराश मुळीच व्हायचं नसतं
चैतन्य सदा फुलवायचं असतं
पाय ओढले म्हणून परतायचं नसतं
पुढे-पुढे जायचं असतं
लोक निंदेला कधी घाबरायचं नसतं
आपलं सामर्थ्य दाखवायचं असतं
जीवनात सुख कल्पनातीत असतं
पण आपले तिकडे लक्ष्य नसतं



## ❀ प्रतिज्ञा पर्यावरणाची ❀



वृक्ष हा माझा मित्र आहे
सार्‍या वृक्षावर माझे प्रेम आहे
या वृक्षांना डेरेदार आणि हिरवेगार ठेवण्याची जबाबदारी माझ्यावर आहे.
मी या वृक्षांची काळजी घेऊन त्याचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करीन.
मी माझ्या मित्रांना पालकांना हितचिंतकांना वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटवून देईन.
आपल्या काळ्या आईची सेवा करून तिला हिरवेगार करण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.
तिचे कल्याण आणि तिची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे

|| जय पर्यावरण ||

|| जय वृक्ष संवर्धन ||

## श्रीमंत देशातले गरीब शेतकरी

जाधव प्रताप हणुमंत
(बी.कॉम.भाग-१)

काही प्रगत देशातले आणि भारतातले कृषी उत्पादनाचे आकडे यांचा आपण तुलनात्मक विचार केला तर काय दिसते ?

इस्त्रायलसारखा छोटा देश वाळूकायम असूनही शेतीमध्ये आपल्यापेक्षा जास्त उत्पादन काढतो.आपण या सर्व गोष्टींचा अभ्यास केला तर आपली प्रगती कोठे थांबली आहे आणि का थांबली आहे यांची कल्पना येईल इस्त्रायल देश केवढा आहे, तो महाराष्ट्र एवढा सुध्दा नाही महाराष्ट्रातले कोणतेही ३ जिल्हे एकत्रीत केल्यावर जेवढे क्षेत्रफळ तयार होते तेवढेच त्या देशाचे क्षेत्रफळ आहे. पण भारतासारख्या शेती प्रधान देशालाही आदर्श ठेवावा असे अनेक यशस्वी प्रयोग या देशातल्या शेतकऱ्यांनी केले आहेत. तिथे



पाण्याची मोठी टंचाई आहे.पाऊस पडतो तरी पण तिथला शेतकरी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा विचार करतो.आभाळातून पडणारा प्रत्येक थेंब आपल्या शेतीच्या कामाला लागला पाहिजे असा प्रत्येक शेतकऱ्याचा प्रयत्न असतो.जमिन आणि पाणी हे शेतीचे दोन मुख्य घटक आहेत.त्यांचा अत्यंत बारकाईने विचार केला तरच भारतीय शेतकऱ्यांची गरीबीतून सुटका होणार आहे.

भारताविषयी जगातले लोक काय म्हणतात हे माहिती आहे का? लोक म्हणतात भारत हेच काय असतो च भारत देश श्रीमंत आहे.सुपीक जमिन देशाच्या बाजूला समुद्र आहे अशी समृध्दी लाभलेल्या अन्य एकही देश या जगात नाही देश उष्ण कटिबंधात असल्याने समुद्राच्या पाण्याची वाफ होऊऊन जुन ते ऑक्टोबर असे चार महिने पाऊस पडतो भारताचा पावसाचा नावाचा ऋतु आहे तसा तो इतर देशात नाही आपल्या देशाचे वैशिष्टे म्हणजे हमखास चार महिने पाऊस पडतोच.

भारतीय उद्योग धंदे १९९० साली ज्या अवस्थेत होते त्याच अवस्थेत आज शेती उद्योग आहे.शेतीला वार्षिक उत्पादन वाढ जेमतेम नाही उद्योगधंद्यात ती १२ टक्के आणि सेवा उद्योगात ती ३५ टक्के आहे.शेतकरी विचार करणार नसतील तर त्यांची वाढ होणारच नाही ती त्यामध्ये लेखलेहीन पैसे नाहीत, भाव नाही, हमिभाव मिळत नाही. इ. पण या अडचणींवर मात करता येईल कारण जमिन आहे पावसाचे हुकुमाचे पाणी आहे वेळ आहे केवट करण्याची क्षमता



## बेटियाँ....


कु.शेख करिना सरदार
(बी.कॉम.भाग-१)



बेटी बनकर आयी हूँ माँ- बाप के जीवन में,
बसेरा होगा कल मेरा किसी और के आंगन में,
क्या ये रीत खुदा ने बनाई होगी
कहते हैं आज नहीं तो कल,
तु पराई होगी देखो.....
जन्म पाल -पोसकर जिसने हमें बड़ा किया....
और वक्त आया तो उन्ही हाथों ने हमें विदा किया,
टूट के बिखर जाती है, हमारी जिंदगी वही.......
पर फिर भी उस बंधन में प्यार मिले जरुरी तो नहीं
क्या रिश्ता हमारा
इतना अजिब होता है , क्या.......
बस यही हम बेटियों का नसीब होता है.....

## आठवतय मला

कु.सोनिया गायकवाड
(बी.कॉम.भाग-१)



आठवतय मला
माझ्यातील मी अन् त्याच्यातील तो
मी त्याची आतुरतेने वाट पाहणं
त्याने मात्र शाळेला दांडी मारणं
मग माझं उगीच त्याच्यावर रुसणं
त्यावर त्याच मिरपल हसणं
वर्गात आमचं एकाच बेंचवर बसणं
मजा-मस्तीत दंग असणं
तुझं-माझं कुणा असताः भांडण
मधल्या सुट्टीत मात्र पुन्हा एकत्र येणं
गप्पा गोष्टी करत मनसोक्त रमणं
निवांत मैत्रीच्या सागरात येऊन पोहणं
आठवतय मला
माझ्यातील मी अन् त्याच्यातील तो

## ❁ माणुसपण ❁

श्री.जाधव टी.डी
([illegible])

कुठे चकाकती तर कुठे लालित्य सुगंध
घालव्या जगात दरवळती माणुसकीचे सुगंध
आपलेच लोक आपापसात भिडलेत
साधेभोळे पण दहशतीने पछाडलेत
रोजचीच लढाई नाही झेपत आता
बघेल तिथे.. फक्त युद्धाच्याच बाता
तरीही वाटत.
देशाच्या या सागरात येईल प्रेमाची लहर
एकजुटीने चालत् बघुयाना बहर
कुणा खोटचात नाही गुंतायचंय
आता एवढच कळत
माणसातलं तेवढं माणुसपण जागवायचं



## [illegible]

कु.सोनाली खंदारे
([illegible])

दररोज का होतो तिच्यावर अन्याय अत्याचार
कोण आहेत हे अत्याचारी जे मुलींना जगात
येण्याआधीच मारतात


का ति मारतात येण्याच्या आधीच तिच्या
अंतिम संस्काराची तयारी करतात?
का नाही तिला इतरांसारखी वागणूक
का केला जातो हा अन्याय



तिन जगात आल्यानंतर का ठेवली जाते
राक्षसासारखी तिच्यावर नेर
का नाही स्वातंत्र्य

का जगात येण्याआधी केला जातो गर्भपात
का नाही तिला हे जग जगण्याचं स्वातंत्र्य
कानाही तिला दिली जात मुलांसारखी
डोळ्यात डोळे घालून बोलण्याची हिम्मत
का नाही तिच्या कर्तृत्वाला किंमत

कसले ते आई-बाप जी तिच्या जन्माला
देतात नकार ?
का नको आहे मुलगी
आहे तरी काय तिचा गुन्हा



का मिळते तिला मुलीची सजा
का नाहीत तिला हुवा सर्व
प्रश्नाचे उत्तर देण्याचे सामर्थ्य
का तिला जन्म घालवता यावं

## ● आयकर रचनेची ओळख ●

श्री.जाधव टी.डी
(बी.कॉम भाग-१)

१. प्रस्तावना

या अंकामध्ये आम्ही आयकर रचना संदर्भात माहिती प्रसिध्द करत आहेत आणि सदरील माहिती सर्व विद्यार्थी,शिक्षक, पालकवर्ग यांना लाभदायक होईल असे आम्हाला वाटते.

आयकर प्रत्यक्ष कर असतो जो व्यक्तीला एकूण उत्पन्नावर केंद्र सरकारद्वारे घेण्यात येतो आणि गोळा केला जातो. मध्यवर्ती करारच्या उत्पन्नाचे महत्त्वपूर्ण स्त्रोत केंद्रीय करादद्वारे आकार आकारला जातो आणि तिला एक भाग सर्वत कल्याण प्रकल्पांसाठी राज्यांमध्ये वितरीत केला जातो.

आयकराची रचना जसो ये ठेवण्यात आली आहे मात्र कलम ८७ अ अन्वये मिळणारी करवसवलतीची मर्यादा २५०० मर्यादा आहे ३,५०,००० वार्षिक पगार असलेल्यांना ही करसवलत मिळते आयकर कलम ८० जीजी अन्वये मिळणारे घरभाडे करसवलतीची (विशीत शहरांसाठी) मर्यादा २४ हजारांवरून ६०हजार रूपयापर्यंत कर्जावर ५०हजार रूपये अतिरिक्त करसवलत मिळेल,परंतु यासाठी घराची किंमत ५० लाख रूपयांपेक्षा अधिक नसावी.

आयकर भरल्यामुळे आपल्याला कोणत्याही प्रकारच्या कर्ज व्यवहारासाठी सर्व बँका पतसंस्थांना

२. आयकराची ओळख

आयकर कायदा १९६१ मध्ये कलम १३९ नुसार प्रत्येक व्यक्ती ज्याचे करपात्र उत्पन्न हे प्राथमिक (बेसिक एक्झंम्शन लिमिट) पेक्षा अधिक आहे, त्याने आयकर पत्रक भरणे गरजेचे आहे. आयकर पत्रक भरण्याचे खूप फायदे आहत यामुळे भारतातील अर्थव्यवस्थेला कर भरल्यामुळे फायदा होतो आयकर भरलेल्या व्यक्तीला ही फायदा होतो.

आयकराची फायदे

१ सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे एक जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येक व्यक्तीचे ज्याचे करपात्र उत्पन्न बेसिक एक्झंम्शन अधिक आहे, त्याचे कर्तव्य आहे की त्याने आयकर पत्रक भरावे.

२. सर्व व्यवहारांना कायद्याचे पाठबळ मिळते.

३. कोणत्याही प्रकारच्या कर्ज व्यवहारासाठी सर्व बँका, पतसंस्था ई आयकर मागीचे आहे व व्यापाऱ्यांसाठी त ताळेबंद आणि लेखापरीक्षकाचा अहवाल

४. आयकर कपात (टीडीएस) आयकर देयापेक्षा अधिक झाली असल्यास आयकर परतावा (रिफंड) घेण्यासाठी आयकर पत्रक भरणे आवश्यक आहे.

५. परदेशात जाण्यासाठी व्हिसा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आयकर महत्त्वाचे आहे



आयकराची कररचना

चालू वर्षी (२०१८- १९) रचना पुढीलप्रमाणे

| Total Income | Tax Rate |
|---|---|
| Up to 2,50,000 | Nil |
| Rs.2,50,000 To 5,00,000 | 5% |
| Rs. 5,00,000 To 10,00,000 | 20% |
| Above Rs. 10,00,000 | 30% |

आयकर भरण्याची दिनांक ३१ जुलै पर्यंत असते.

### अशा प्रकारे असल्यामुळे याचा फायदा सर्वांना होईल

आयकरी रिटर्न कसं भरायचा हा मोठा प्रश्न असतो. मात्र आपण थोडी जरी माहिती घेतली तरी आयटी रिटर्न भरणं किती सोपं आहे हे कळेल,

४. भरण्याची पध्दती

१ आयटी रिटर्न भरण्याची पध्दती

२. आयटी रिटर्न भरण्यासाठी कागदपत्रं आवश्यक ते पुढीलप्रमाणे

३. तुमच्या उत्पन्नानुसार कागदपत्रांची आवश्यकता असेल,तुम्ही नोकरदार असाल तर कंपनीने आणि शासकीय कार्यालयाने दिलेला फॉर्म नं.१६ सर्वात महत्त्वाचा आहे.
याशिवाय तुमचं बचत खाते किंवा मुदत ठेव डिपॉझिट असेल त्यावर मिळणारे व्याज हे करपात्र आहे.

४. पॅन कार्ड,आधार कार्ड,बँकेचे खाते, ई मेल आय डी, मोबाईल इ.माहिती आवश्यक www.incometax.com या वेब साईट वर हा आयकर रिटर्न भरला जाते इतर कोणत्याही साईट वर भरल्याने नाही

५. आयकर हा(लेखापरीक्षक, कर सल्लागार) संबंधीत व्यक्तिकडून भरावा लागतो.

४. आयकर वाचवण्यासाठी उपाययोजना :

१ कलम 80C खाली विविध गुंतवणूक केल्यास उत्पन्नातून त्याची वजावट मिळते.

२. सदर सूट ही रू.१,५०,००० पर्यंत मर्यादित आहे ही बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

३. या अंतर्गत भविष्य निर्वाह निधी,राष्ट्रीय बचत पत्र, विमा, म्युच्युअल फंड ५ वर्षे कालावधीसाठी बँकेत मुदत ठेव (N.S.C)पेन्शन फंड, मुलांची ट्युशन फी, गृहकर्जावरील परतफेड केलेली मुद्दल, नाबार्डचे रोखे, पाच वर्षांची पोस्टात मुदत ठेव इत्यादींचा समावेश होतो.

४. कलम 80E खाली जर शिक्षण कर्ज घेतले असेल तर, ज्या वर्षापासून व्याज देण्यास सुरूवात केली त्या वर्षासाठी आठ वर्षांपर्यंत सूट मिळते. या कलमाखाली स्वतःसाठी किंवा पत्नी आणि मुलांसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजात सूट मिळते

अनुमान :

वरील लेखानुसार आयकर ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. असे समजते त्यामुळे याचा फायदा सर्वांनाच होतो असे आपणास समजते व देशाचे आर्थिक बळ वाढण्यास मदत होते.



## मुलगी

श्री.जाधव टी.डी
(बी.कॉम भाग-१)

आई मी तुझ्या गर्भातून बोलतेय
आई मी तुझी मुलगी तुला
हाक मारतेय........


बाबा मी तुमची मुलगी
तुम्हाला विचारतेय
का हक्क नाही मुलीला जगायचा
का मारतात गर्भातच तिला

बाबा एक मुलीच जन्म देते
ना मुलाला
का मारतात मग त्याच मुलीला



बाबा मोठे करीन
मी तुमचे नाव
पण मला या जगात
तरी येऊ दे

बाबा , बाबा
मला मारू ना मला
मला हे जग पहायचय
या जगात येऊन
या निळ्याशार आकाशात
उंच उंच उडायचंय



## जीवन

श्री.जाधव टी.डी
(बी.कॉम भाग-१)

जीवन हे असचं असतं
कधी सुख कधी दुःख
कधी ऊन कधी सावली
कधी दिवस कधी रात्र
कधी हसू कधी आसू
कधी आशा कधी निराशा
कधी यश कधी अपयश
कधी विजय तर कधी पराजय....
जीवन हे असच असत
दुःखाला हरवून
सुखाला जिंकायच असत
जीवन हे असच जगायच असतं



## ❋ जीवन हे कसं असावं ❋

जीवन हे कसं असावं ?
जंगलात फिरायला जावं
चालून चालून थकल्यामुळे
झाडाखाली बसावं
समोर चिंधू दिसावा
त्याला मारण्यासाठी दगड उचलावा
दगडाखाली भलामोठा साप दिसावा
घाबरून पळता पळता
बेलीने भरलेल्या विहिरीत पडावं
विहिरीत मगर असावी
मगरीला घास देण्यापूर्वी फांदीवर पडावं
पाण्याच्या शोधात विहिरीकडे आलेला
वाघोबा दिसावा
चिडीने फांदीवरचा तोल जावा
मधमाशांच्या पोळ्यातील मधमाशांनी चावा
देण्यासाठी गुंजारव करावा
मधमाशांच्या पोळ्यातून टपकणारा
मधाचा थेंब तोंडात पडावा
म्हणून तर प्राशन करावा
यालाच तर दुसरे नाव
जीवन होय





सुविचार
दुसऱ्याच्या आयुष्याचा अभ्यास करा पण,
तसेच करण्याचा प्रयत्न करू नका,
कोणासारखे बनायचे हा विचार नको
कोणीतरी बनायचे हा विचार करा

सोनार ज्ञानेश्वरी बालाजी



## ❋ बेटियाँ ❋

स्नेहल लक्ष्मण मुखेकर


ओस की बूंदे सी-होती है बेटियाँ ।
पापा की दुलारी और जान से.....
प्यारी होती हैं बेटियाँ
मेर अगर कठोर हो तो ......
रोती हैं बेटियाँ......
दो कुलो की की लाज.......
होती है बेटियाँ ।
हीरा है अगर बेटा,
तो सच्चा मोती है बेटियाँ ।
काँटो की राह पे......
फूल बिछाती है बेटियाँ ।
कहने को तो पराई अमानत.....
होती है बेटियाँ।
पर बटो से बढ़कर , होती है बेटियाँ ।



## ❋ मित्र ❋


स्नेहल लक्ष्मण मुखेकर

आहात तुम्ही सावरायला
म्हणून पडायला आवडते,
आहात तुम्ही हसवायला
म्हणून रडायला आवडते
आहात तुम्ही समजवायला
म्हणून चुकायला आवडते,
माझ्या आयुष्यात आहेत
तुमच्यासारखे मित्र
म्हणून मला जगायला आवडते.....



## माँ

स्नेहल लक्ष्मण मुखेकर
(बी.सी.ए. भाग-१)



माँ, भले ही पढ़ी लिखी
हो या नही हो पर
संसार का दुर्लभ
व महत्वपूर्ण ज्ञान
हमे माँ से ही
प्राप्त होता है ।

मंजिल दूर और सफर बहुत है
छोटी सी जिंदगी की फिकर बहुत है ।
मार डालती है ये दुनिया कब की हमें......
लेकिन माँ की दुआओं में असर बहुत है ।

मैने माँ की हथेली पर एक काला तिल देखा
और कहा की माँ यह दौलत का तिल है ।
माँ ने अपने हाथो में मेरा चेहरा थामा
और कहा......
हाँ बेटा देखो मेरे दोना हाथो मे कितनी दौलत है ।

मैने माँ के कँधे पर सर रख के पूछा ।
माँ कब तक अपने कँधे पर सोने दोगी ?
माँ कहाँ जब तक लोग मुझे अपने
कँधे पर उठा न ले !!

नींद अपनी भुला के सुलाया हमको
आँसू अपनी गिरा के हँसाया हमको
दर्द कभी न देखा उन हस्तियों को
खुदा ने माँ नाम बनाया जिनको ।






## शिक्षक म्हणजे काय ?

स्नेहल लक्ष्मण मुखेकर
(बी.सी.ए. भाग-१)

शिक्षक म्हणजे विश्वास,
शिक्षक म्हणजे अभिमान,
शिक्षक म्हणजे जीवनात
जगण्याचा स्वाभिमान......

शिक्षक म्हणजे मित्र,
शिक्षक म्हणजे आकांक्षा,
शिक्षक म्हणजे तिमिरात
पोहचणारा प्रकाश......



शिक्षक म्हणजे सुख-दुख,
शिक्षक म्हणजे हर्ष,
शिक्षक म्हणजे जिव्हाळ्याचा
हळुवार देणारा स्पर्श......

शिक्षक म्हणजे तेज,
शिक्षक म्हणजे नात,
शिक्षक म्हणजे प्रवेशाला,
हवा असणारा मोहक वारा......

शिक्षक म्हणजे प्रेम,
शिक्षक म्हणजे जाणीव,
शिक्षकाशिवाय जीवनात,
असणारी जाणीव......

शेवटी मी इतकेच सांगेन
शिक्षक म्हणजे ओढ,
शिक्षक म्हणजे आठवण,
शिक्षक म्हणजे आयुष्यातील,
न संपणारी आठवण......

## जिवनाची लाट

पाटील दिशा शरद
(बी.सी.ए. भाग-१)

समुद्राची लाट तीच
माझ्या जीवनाची लाट
लाख वाटेतून निघून जावे
कोठेतरी जाऊन मनमोकळे करावे
गुलाबाच्या फुलासारखे जीवन
सुखी करावे
मन निर्मळ होऊन



उमलल्या फुलासारखे जगावे
जसे सायंकाळचे सुंदर पसरावे
खळखळत्या पाण्यासारखे वाहत जावे
तीच समुद्राची लाट व्हावी
आणि तीच माझ्या जीवनाची पहाट व्हावी

# ❊ जीवन ❊

बळके अश्विनी उत्तम
(बी.कॉम.भाग-१)

जीवनाच्या वाटेवरून जात असताना जीवनात अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागते. या येणाऱ्या अडीअडचणींवर आपण धैर्याने मात केलती पाहिजे. मला जीवना जगत असताना कवी मंगेश पाडगावकरांच्या चार ओळी आठवतात. त्यात जीवनातील अर्थ दडला आहे त्यातून जीवनातील सार लक्षात येतो.

या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे
या ओठांनी चुंबुनि घेईन हजारदा ही माती
अंनत मरण झेलून घ्यावी इथल्या जगण्यासाठी
इथल्या पिंपळपानावरती अवघ; विश्व तरावे
या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे

जीवन जगत असताना जीवनाची व्याख्या मी अशी करते की. जीवनाची व्याख्या मी अशी करते की, जीवन म्हणजे तरी नेमक काय असतं ?

जीवन म्हणजे सुख दुःखाच्या उभ्या-आडव्या धाग्यांनी विणलेला सुंदर रेशमी वस्त्र असतो.

अहो जीवनात जरी अपयश आले तरी कधी खचून जाण महत्वाचं नसत त्या अपयशावर जिद्दीने मात करायचयाची असते.आम्हाला वाचतांना असताना एक धडा होता युवकांपुढील आव्हाने याधड्यात लेखकांनी अनेक उदाहरणे दिली आहेत लेखक या धड्यात सांगतात की,यशवंतराव चव्हाण यांनी लोकमान्य टिळकांचा गुणगौरव केला आहे.

सुप्रिम कोर्टात लो.टिळक एक खटला हरतात त्यावर एक गृहस्थ टिळकांना एक प्रश्न विचारतात काहो टिळक हा खटला तुम्ही हारलात निराश झालात का हो ? त्यावर टिळक त्या गृहस्थाला म्हणाले माझ्यावर कितीही मोठे आभाळ कोसळले तरी मी हार मानणार नाही मी त्यावर पाय देऊनउभा राहीन यावर लेखक म्हणतात की देशातील तरूणांनी अशी प्रेरणा आपल्या अंगी बाळगावी व कधी जीवनात खचून न जाता नेहमी पुढे चालत रहावे.

जीवन कधीच सोपं नसतं ते जगत असताना अनेक वेडी-वाकडी वळणे येतात, ही वेडीवाकडी वळणे आहेत.म्हणून तर माणसाला जीवन अगदी कठीण-कठीण वाटत आपला दृष्टीकोन नेहमी सकारात्मक ठेवायचा कधीच नकारात्मक दृष्टीकोन ठेवायचा नाही.आपणास माहित आहे का प्रसिद्ध तत्वज्ञांनी अलेक्झांडर शेक्सपियर यांच्या डिक्शनरीत अशक्य हा शब्द नव्हता ते म्हणायचे की जगात अशक्य अशी कोणतीच गोष्ट नाही सर्व काही शक्य आहे.

जीवन म्हणजे काय आपणच ठरवायचं असत त्याला कोड म्हणायचं नसत नेहमी दुसऱ्याकडे पाहताना आपला दृष्टीकोन सकारात्मक ठेवायचा कधी कोणालाही तुच्छ लेखायचे नाही आपणे तर

## ❊ हिंदी दिवस ❊







## ❊ आरोग्य विभाग ❊





## ❊ आरोग्य विभाग ❊



## ❋ अर्थशास्त्र विभाग ❋








## ❋ वारी एक अभ्यास / कॉमर्स चित्रपत्रक ❋








## पेंटिंग्ज


मंजुषा भोसले


जाधव जे.एस


सुरज भासाळे


अंजली काकडे


अंजली काकडे


सुरज भासाळे


सुरज भासाळे


जाधव जे.एस



## भुगोल अभ्यासक मंडळ













## भुगोल विषय शाळी परीक्षा













❀ भुगोल विभाग अभ्यास सहल ❀



❀ स्पर्धा परिक्षा केंद्र -व्याख्यान ❀ ❀ मराठी भाषा दिन ❀



❀ राष्ट्रीय सेवा योजना कॅम्प ❀



❀ राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय कॅम्प ❀



❀ [illegible] ❀



## आषाढ वारी योजना नियोजन



## क्रिडा विभाग



नेहमी आम्हाला प्रोत्साहन देत असतात आपल मन नेहमी आनंदातच स्वच्छ ठेवायच पोटात एक व ओठांवर एक असे कधी वागायचे नाही जे असेल ते रोख ठोक बोलायचे पाठीमागे कोणाला नावे ठेवायचे नाहीत ते म्हणतात हा गुरु मंत्र आहे

सकारात्मक विचारांना मी माझ्या जीवनात मोठे स्थान देते खरे बोलणे सहनशीलता प्रामाणिकपणा धैर्य यांसले ,विचार, चिंतन,मनन या गोष्टींना आपण आपल्या जीवनात स्थान दिले पाहिजेत.नेहमी पॉझिटिव्ह विचार ठेवला पाहिजे समोर पाण्याने भरलेला पेला हा अर्धा भरलेला आहे असे म्हटले पाहिजे हा होकारात्मक दृष्टीकोन झाला तर तोच पेला अर्धा रिकामा आहे हा नकारात्म दृष्टीकोन झाला.म्हणून मला एक सुविचार आठवतो स्वप्न व ईश्वराला फसवता येत नाही प्रयत्न केल्या शिवाय यश मिळत नाही.


म्हणूनच मी म्हणते तुमचे विचार बदला तुमचे जीवनच बदलून जाईल.

## ० श्रावणाची खुलते कळी ०

भाले सुषमा कृष्णदेव
(बी.कॉम भाग-१)

श्रावणाची ती एक लहर
भरली निसर्गाच्या अंगोअंगी
आनंद आभाळा दाटली
हिरवळ पसरली पानोपानी
झरझर श्रावण धारा झरूनी जाई
मन आकाशी कोकीळा जाणी होई
जाई सोडून आपले घर लहानशा कोळी
अतीव खुलते श्रावणाची कळी ।।

मन भावन प्रीतीचा माझा श्रावण
मने हर्ष देऊन आला तुझा साजण
जलबिंदूचे मोती पसरले आज रानोरानी
मोती नव्हे जणू हिरे झुलती त्याच्या कानी
उन सावलीचा लपंडाव रे
वेलूंद नाचे मोराचा पिसारा
इंद्राच्या मागून डोकावते सुर्य सकाळी
अतीव खुलते श्रावणाची कळी ।।२।।



सात रंगाची नवलाई
सांगत येई इंद्रधनुची कमानी एका रंगेत
पांढरा शुभ्र ओढा तो हुंदडे पाणी
त्याला किनारा काजळचा दिसा लाचे
चंद्र चांदण्या आकाशी जसा तुटणारा तारा
देऊन येई ओलावा झोपणारा ओलसर वारा
पाहुनही मनसोक्त निसर्गात खेळी
अतीव खुलते श्रावणाची कळी ।।३।।



स्वप्नाचा नवीन बहर सजला मनी
फुलांची रांगोळी दिसले प्राण अंगणी
श्रावणाच्या पावसाची पहिली संगत
पैशी हृदु अडवली ती गंमत
श्रावण आणि निसर्ग यांचा संवाद
जागवतो मनात जगण्याची नवीन आस
श्रावणाची महान निराळी
अतीव खुलते श्रावणाची कळी ।।४।।



सळसळणार पण ते नवखळ गांत
प्रेमाच्या भावेत प्रेमाला साथ पाळणार
अतूट बंधाच्या राखीन नियमात
आनंद भाऊबहिणीच्या नात्याचं खूप असावा
श्रावणाच्या राखीने घर पहला हा सोहळा
रेशम धागा राखीची अतूट त्या नात्याची
पवित्र काळाची बहीण भाऊ ओवाळी
अतीव खुलते श्रावणाची कळी ।।५।।



कोसळल्या या झराच्या कडा
जातांने वाहून जातात अनेक गोष्टीचा उलगडा
मागे वळून पाहताना आठवतात त्या श्रावणाला
आज हा कोरडे अश्रूच्या लाटा
जणू आठवणात श्रावणाच्या लाटा
जरा हे मेघ सारा पुन्हा यावेळी
श्रावण खुलत रहावी श्रावणाची ती कळी ।।६।।

## ॥ महिला उद्योजकांची समस्या व त्यावरील उपाय ॥

मोनाली देशमुख,हर्षदा इंगळे
मार्गदर्शन- प्रा.डॉ.मोरे एस.टी
(बी.कॉम.भाग-२)

प्रस्तावना :-

महिला उद्योजकाच्या समस्या व उपाययोजनेसंदर्भातील कारण ग्रामीण भागामध्ये पारंपारिक उद्योगात
महिलांचा समावेश असतो.परंतु अशा समस्यांना सामोरे जावे लागते ग्रामीण भागातील महिला उद्योजकास असलेल्या संधीचा अभ्यास करून उद् भवणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना याकरिता हा लेख प्रसिद्ध करीत आहोत.जेणेकरून महिला ग्रामीण भागातील जास्तीत जास्त महिला उद्योजक तयार होतील असे वाटते.

या पत्रलेखनाचा उद्देश हा ग्रामीण महिला उद्योजकाच्या समस्या जाणून त्यावर उपाययोजना सुचविणे हा होय.

महिला उद्योजकाची ओळख :-

महिला उद्योजक म्हणजे एखादी महिला किंवा महिलांच्या समूहास करावे लागणारे विशिष्ट कार्य ज्यामध्ये व्यवहार संघटन व्यवस्थापन धाडस आणि नफा या गोष्टींचा समावेश असतो अशा महिला व महिलांच्या समूहास उद्योजक असे म्हणतात.

ज्या उद्योगामध्ये भांडवल आणि रोजगार या दोन गोष्टींमध्ये महिलांचा सहभाग असतो. अशा सहभागास महिला उद्योजक असे म्हणतात.थोडक्यात महिला उद्योजक ही एक अशी व्यक्ती की जी विशिष्ट कार्याच्या हेतूने नफा प्राप्तीसाठी उत्पादन व सेवा यांची निर्मिती करून ते गरजू लोकांच्या पर्यंत पोहचविते.

महिला उद्योजकास उद्भवणाऱ्या समस्या :-






१. आर्थिक समस्या :-

महिला उद्योजकास उद्भवणाऱ्या समस्यांपैकी ही एक अत्यंत महत्त्वाची समस्या होय. उद्योजक व्यवसायाच्या आवश्यक असणारे प्रचंड भांडवल बँका व वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरूपामध्ये घ्यावे लागते परंतु बँका व वित्तीय संस्थांच्या अकार्यक्षम व उदासिनतेमुळे महिला उद्योजकांना वित्तीय सहाय्य सहजासहजी उपलब्ध होत नाही.

२. अपुरा कच्चामाल :

उत्पादनासाठी पैशाबरोबर कच्चामालाची पुरेसा प्रमाणात उपलब्धता असणे आवश्यक होय.महिला उद्योजकांना आवश्यक असणारा कच्चामाल योग्य प्रमाणात योग्यवेळी आणियोग्य किंमतीत उपलब्ध होण्यास अडचण येते आणि यामुळे मागणीनुसार वस्तूंची निर्मिती करण्यास अडचण येते.

३. मर्यादित उत्पादन साधने :

कोणत्याही उद्योगास आवश्यक असणारे घटक म्हणजे पैसा,मनुष्यबळ, यंत्रसामग्री,तंत्रज्ञान, कार्यपद्धत आणि पायाभूत सुविधा या गोष्टी महत्त्वपूर्ण मानल्या जातात महिला उद्योजकांना उत्पादनास आवश्यक असणाऱ्या मर्यादित साधनामुळे आणि उत्पादनावर आवश्यक समजले जाणारे विपणन कौशल्य याचा अभाव असल्याने व्यवसायाचा विकास होत नाही.

४. शिक्षणाचा अभाव :

महिला उद्योजकामध्ये आवश्यक असणारे पुरेसा प्रमाणातले शिक्षण याची कमतरता असल्याने व्यवसायाचा विस्तार -विकास करणे समस्याकारक होते.शिक्षण म्हणजे आधुनिक पद्धतीने उत्पादन करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य होते.

५. पुरुषप्रधान संस्कृती :

आपल्या देशामध्ये आजही जुन्या रूढी-परंपरा या गोष्टींचा दैनंदिन जीवनामध्ये वापर केला जातो समाजातील पुरुष आणि महिला या दोन घटकामध्ये तफावत ठेवण्यात आली आहे.

६. जोखीम स्वीकारण्याची क्षमता :

बहुतांश महिला या आपल्या घरकामध्ये व्यस्त असतात.उद्योग -व्यवसायातील असलेली जोखीम स्वीकारण्यात अनेक समस्या निर्माण होतात. केवळ कुटुंब व कुटुंबातील सदस्यांचे पालनपोषण या कारणामुळे उद्योगातील जोखीम स्वीकारता येत नाही.

७. जागतिक स्पर्धा :


आजच्या आधुनिक जागतिक स्पर्धेमध्ये आपल्या देशातील महिलांना आपला उद्योग टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान मानले जाते.महिला उद्योजकाच्यामार्फत पारंपारिक साधनांचा वापर करून व्यवसाय चालविण्यात येतो. परंतु जागतिक धोरणामुळे इतर देशातील उद्योग व्यवसायासमोर स्पर्धा करण्यास

८. सामाजिक रुढी परंपरा :-

देशातील जुन्या चालीरिती, सामाजिक रुढी,परंपरा आजही पाळल्या जातात. यामध्ये महिला उद्योजकास आपल्या उद्योग -व्यवसायाचा विस्तार व विकास म्हणावा तसा करता येत नाही.सामाजिक रुढी-परंपरा नष्ट झाल्याशिवाय कोणताही विकास होऊ शकत नाही.

महिला उद्योजकाच्या समस्येवरील उपाय :-

देशातील जुन्या चालीरिती, सामाजिक रुढी,परंपरा आजही पाळल्या जातात. यामध्ये महिला उद्योजकास आपल्या उद्योग -व्यवसायाचा विस्तार व विकास म्हणावा तसा करता येत नाही.सामाजिक रुढी-परंपरा नष्ट झाल्याशिवाय कोणताही विकास होऊ शकत नाही.




१.कुटुंब व समाजातून प्रोत्साहन देणे :-

महिला उद्योजकास आपल्या कुटुंबातील व समाजातील व्यक्तींमार्फत मानसिक आधार मिळणे, आवश्यक आहे.कोणत्याही उद्योजकीय कार्यास प्रोत्साहन प्राप्त झाल्याने ते कार्य अत्यंत चांगल्या पध्दतीने पूर्ण करता येते.

२.उच्च मालाची उपलब्धता :-

अनेक महिला उद्योजकांना आपल्या व्यवसायासाठी आवश्यक असणारा कच्चामाल सहजासहजी उपलब्ध होत नाही किंवा तो महाग किंमतीमध्ये खरेदी करावा लागतो.अशा प्रकारचा कच्चामाल शासनाच्या मार्फत सवलतीच्या दराने व उपलब्ध करून दिल्यास महिला उद्योजक आपला व्यवसाय चांगल्या पद्धतीने करू शकतात.

३.प्रशिक्षण उपलब्ध करणे :-

महिला उद्योजकाकडे उद्योग व्यवसायास आवश्यक समजले जाणारे प्रशिक्षण याचा अभाव असल्याने वस्तू व सेवांचे उत्पादन करण्यास आणि जागतिक स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी समस्या निर्माण होतात. शासनाच्या वतीने महिला उद्योजकाला प्रशिक्षण शिबीर आयोजन करून महिला उद्योजकामध्ये

४.भांडवल उपलब्ध करून देणे :-

उद्योग व्यवसायासाठी आवश्यक असणारे भांडवल प्राप्त करण्यासाठी महिला उद्योजकांना अनेक समस्या येतात अशा प्रकारचे भांडवल शासनाच्या वतीने वित्तीय संस्था व बँका यांच्यामार्फत सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध होणे आवश्यक होय.

५. विपणनास व व्यवस्थापनास सहाय्य :-

अनेक महिला उद्योजकांना योग्य व्यवस्थापन व विपणन याच्या अभावामुळे व्यवसाय चालविण्यास समस्या निर्माण होतात. महिला उद्योजकामार्फत उत्पादन केलेल्या वस्तू यांची विक्री सदोष विपणनामुळे कमी प्रमाणात होते. विपणन व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिल्याने वस्तूच्या विक्रीमध्ये वाढ होते.

६.शासकीय योजनांची अंमलबजावणी :-

महिला उद्योजकांच्या विस्तार व विकास करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध संस्थाच्या माध्यमातून अनेक योजना अस्तित्वात आहेत. परंतु शासकीय अधिकाऱ्यांच्या उदासीन

७. यंत्रसामग्रीची उपलब्धता :-

महिला उद्योजकांना आपला व्यवसाय आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून उत्पादित केल्यास वस्तूची विक्री मोठ्या प्रमाणात करता येते.आणि जागतिक स्पर्धेमध्ये टिकून राहता येते.आधुनिक यंत्रसामग्री ही महागडी असल्याने यांची खरेदी करण्यास शासनाकडून अनुदान मिळणे आवश्यक होय.

अनुमान व सल्ला:-

सदरील लेख तयार करण्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून नोटस् काढण्यात आल्या, शिक्षकाचे मार्गदर्शन लाभले.

संदर्भ सूची:-

महिला उद्योजकता या संदर्भातील वाणिज्य शाखेतील पुस्तके, इंटरनेटच्या माध्यमातून नोटस् शिक्षकाने दिलेल्या नोटस् इ. या संदर्भ घेऊन हा लेख तयार करण्यात आला.

## साथ

कु.दिक्षीत सुजाता
(बी.कॉम भाग-१)

फिक्कटात फुलतं म्हणुन काय झालं
फिक्कटालाही शोभा कमळ देत असतं
आपण थोडसं हसलं म्हणून काय झालं
आपल्यासाठीही कुणीतरी हसत असतं
आपण थोडसं रडलं म्हणुन काय झालं
आपल्यासाठीही कुणीतरी अश्रु ढाळत असतं
आपण थोडस सुखावलो म्हणुन काय झालंय
आपल्यालाही आनंद कुणी शोधत असतं
जीवनात असंच असतं
आपण कुणालातरी नकळत साथ देत असतो,
पण कशी ?
हेच आपल्याला माहित नसतं.....



## कविता कशाविषी वाटत नाही

कु.दिक्षीत सुजाता
(बी.कॉम भाग-१)

मला आज कविता कशाविषी वाटत नाही
मन हलकं करुन बोलावसं वाटत नाही
भावनांनी भारावलय मन
पण शब्दरुप त्यांना द्यावसं वाटत नाही

मनातलं कुणाला बोलावसं वाटत नाही.
सुख आहे दुख आहे पर सगळंस वाटत नाही
सांगितलंच तर ऐकून पण घेतील
पण कुणाला आपलं मानावंस वाटत नाही.



खळखळुन हसावसं कधी वाटत नाही
दिवाण्यांच हसु ओठावर आणावंसं वाटत नाही
भावना उराशी दाटून येतात
पण मन मोकळेपणानं रडावंस वाटत नाही
आणि म्हणुनच म्हटलं कि
आज मला कविता कशाविषी वाटत नाही

## आई-बाप

कु.दिक्षीत सुजाता
(बी.कॉम भाग-१)

ठेच लागता तोंडुन शब्द फुटतो आई.....
मोठे संकट पाहुता शब्द फुटतो बाप रे बाप
मग म्हातारपणी त्यांनाच घराबाहेर काढण्याचं का करतो पाप
लहानपणीची माया विसरलास का?
त्यांना दिलेला शब्द विसरलास का?
म्हणाला होतास करेन तुमची सेवा, करेन तुमची छाया,
मग एवढ्या लवकर विसरलास , त्यांची ती माया
लहानपणी आईच्या हातची पुरणपोळी खाल्ली
आता मात्र बायकोच्या हातची भाजी गोड लागली ?
लाख जरी मारतील त्यांना, करतील ते सहन
तुमच्या मायेपोटी म्हणतील ,अजुन आहेस तू लहान
भिकारी त्यांची माया तु जाणून घे,
त्यांच्यातील विठ्ठलाशी तु ओळखून घे
कारण पुन्हा वेळ निघुन गेलेली असेल.
माने फक्त त्यांची आठवण उरलेली असेल
असे आई-बाप पुन्हा नाहीत मिळणार
पश्चातापाशिवाय तुमच्या हाती काही नाही उरणार.........



## मैत्री

कु.दिक्षीत सुजाता
(बी.कॉम भाग-१)


रडताना पाहुन हसवणारी
भावनाविवश मनाला मार्ग दाखविणारी
भावना हरवलेल्या मनाला
हळुवार प्रेमाचा स्पर्श करणारी
जीवनाच्या प्रत्येक पावलावर
खंबीरतेने साथ देणारी
एकमेकांची मन समजून घेणारी
अशी तुझ्यासारखी मैत्री असावी



## कविता

कु.नाले मोनाली
(बी.कॉम.भाग-१)

कळलंच नाही वर्गातल्या मुली कुठं गेल्या...
संगी,मंगी,कंगी,नंदी हातातल्या चिठ्ठी-चिठ्ठी
आम्ही वर्गात आहोत की स्वर्गात...
खेळाच्या कडकडाच्या वागड्याच्या नाचाच्या
म्हणलं तर खूप अवघड होत्या
त्या फ्रॉक,पोलके,चापूनचोपून घातलेल्या वेण्यांसकट
त्या डोळ्यासमोरून तरळून गेल्या...
कळलंच नाही वर्गातल्या मुली कुठं गेल्या...



आम्ही तेल-पाणी आणायचो त्या वर्ग सारवायच्या
शाळा सुटल्यावर कधीही त्याच आवरायच्या
आम्ही वर्ग झाडायचो त्या बसकरं घालायच्या
आम्ही पटांगण झाडायचो त्या सडा मारायच्या..
त्या लंगडी , झिम्मा, फुगडी घालायच्या
सर्वांशीच मनमोकळं बोलायच्या....
अभ्यास मात्र मन लावून करायच्या
कवितेत तर खूप-खूप रमायच्या
सातवीपर्यंत गावातल्या शाळेत त्या आमच्या बरोबर शिकल्या
कळलंच नाही वर्गातल्या मुली कुठं गेल्या...

सातवीनंतर परत,असा काही नियम नव्हता
बाहेर गावी मुलींना कोणीच पाठवत नव्हता
शाळा सुटली पाटी फुटली मुली बसल्या घरात
आम्ही दिवटे चिरंजीव शिकत राहिलो शहरात
अभ्यासातच त्या बोहल्यावर चढल्या....
कळलंच नाही वर्गातल्या मुली कुठं गेल्या....





पिवळं कुंकवाच्या आतच,
आम्ही मामा झालो,काका झालो,
त्या आई झाल्या, मावशी झाल्या,
सासू झाल्या, सून झाल्या.
नणंद झाल्या, भावजई झाल्या
विहिरीवर पाण्याला गेल्या,
रानात गेल्या,वनात गेल्या,काही स्टोव्हवर गेल्या
काही शेगडीवर गेल्या
काही परत आल्याच नाही,काही परतल्या
पण घर करपल्या, जळालेल्या भाकरी सारख्या
व्यवस्थेच्या चरकयात पिळल्या गेल्या...
कळलंच नाही वर्गातल्या मुली कुठं गेल्या....



त्या सावित्री होत्या , त्यांना एकही फुले भेटला नाही
त्या जिजाऊ होत्या पण एकही शहाजी भेटला नाही
त्या कस्तुरबा होत्या ,एकही गांधी भेटला नाही
कुणी म्हणत त्या परकराचं धन झाल्या
कुणी म्हणत, निर्माल्य होऊन जीवन गंगेत
वाहून गेल्या.....

मला वाटलं त्या नवीन प्रकारे सती गेल्या
काही असे त्या आता दिसेनाशा झाल्या
कळलंच नाही वर्गातल्या मुली कुठं गेल्या...

## जीवनाचे अर्थ असेही

कु.नवले सोनाली
(बी.कॉम भाग-१)

समुद्रासारखं घनगंभीरता यावी, आकाशासारखं सखोल विशालता यावी निर्झराप्रमाणे झरता यावे, वाऱ्याप्रमाणे स्वच्छंदी जगता यावे पक्ष्यासारखे निर्भय गाता यावे.

फुलपाखरांचे पंख लावून उडता यावे, चिखलाने खोचलेल्या कमळासारखे -चैतन्याने पोहचणारे आणि मातीतून उमललेले प्रेम करता यावे, गाईच्या नजरेतून पाझरणाऱ्या वात्सल्यासारखे द्रवता यावे शेवटी मनुष्य देहाचे जगणे असावे.

प्रत्येकाला माहित असते की जगताना कसे जगावे परंतु हे कळत असताना देखिल मनुष्य वळत नसल्याप्रमाणेच वागतो.पण अनेकजण जगताना प्रवाह जसा वाहिल तसे जात राहतात.वारा जसा वाहिल तसे वाहत राहतात.पायाखाली जशी वाट येईल तसे चालत राहतात.प्रवाहाविरुद्ध चालणारे तसे थोडेच, जसे वादळवाऱ्यात तग धरणारेही थोडेच आणि आपली वाट निर्माण करणारे तर दुर्मिळच ! जीवन जगायचेच तर, माझ्या इच्छेप्रमाणे जगेन चालायचेच तयार केलेली वाट आणि माझ्या जीवनाचा शिल्पकारही मीच असेन ह्या ओढीने जगणे, म्हणजे खरे जगणे बहिणाबाई आपल्या कवितेत म्हणतात ना

जग जग माझ्या जीवा, असं जगणं तोलाचं
उंच गगनासारखं धरित्रीच्या रे मोलाचं

निसर्ग हा नेहमीच दान देण्यासाठी आतुरलेला असतो. त्यामध्ये निसर्गातील प्रत्येक वस्तू ही स्वतःजवळील काहींना काही मनुष्याला देत असतात निसर्गाकडील हा गुण मनुष्याला आत्मसात करण्यास भाग पाडत असतो.पण त्याचप्रमाणे आपले अंतर्मन हे जसे विकृत प्रक्षेपणाचे केंद्र बनू शकते त्याचप्रमाणे ते संस्कृती साकार करण्याचे महासामर्थ्य स्थानसुद्धा होऊ शकते.अंतर्मनाच्या या महाशक्तीला कसे हाताळावे हे सर्वस्वी बहिर्मनावर अवलंबून आहे. प्रचंड व महाकाय अशा हत्तीवरून हुशार माहूत युक्तीच्याद्वारे खूप काम करून घेऊ शकतो. याच्या उलट मूर्ख माहूत मात्र काहीतरी आचरटपणाने वागून त्याच हत्तीचा रोष ओढवून घेऊन स्वतःला त्याच्या पायाखाली भुईसपाट करून घेतो.अंतर्मनाचा हा स्वभावधर्म न समजल्यामुळेच मानव खऱ्या धर्माला मुकला इतकेच नाही तर धर्माच्या नावाखाली तो केवळ अधर्माचाच पुजारी बनला.धर्माच मानले कोणत्या थराला जाऊन काय करतील हे साक्षात ब्रम्हदेव सुध्दा सांगण्यास असमर्थ ठरतील इतिहासाकडे नुसता दृष्टीक्षेप जरी टाकला तरी या तथाकथित धार्मिक चक्रम लोकांनी धर्माच्या प्रांतात पराक्रमाचा काय विक्रम केला ते सहज दिसून येईल.

धर्मासाठी मानव नसून मानवासाठी धर्म आहे. हे सत्यच मानवांना कळेनासे झाले.देवाचे दिव्यत्व धर्माची धार्मिकता व मानवाचे मानुषपणा या तीन गोष्टींचा त्रिवेणी संगम माणुसकी या प्रेमात आहे माणुसकीला जो जपला त्यानेच देव पूजला,त्यानेच धर्म पाळला व तोच माणूस या पदाला शोभला

वास्तविक बिकट परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग एकच व तो म्हणजे आपले मन मजबूत करणे हा होय या मनाला मजबूत करण्यासाठी ज्याप्रमाणे माणसाला गरीब व श्रीमंत हे पैशावरून ठरविले जाते त्याप्रमाणे माणसाच्या मनाला जवळ पैसा असताना मजबूतपणा असल्यासारखे वाटते यामध्ये प्रामुख्याने महिनाभर काम केल्यावर आपल्याला जी मिळकत होते त्यातून सूज्ञ माणसे काही रक्कम बाजूला ठेवून ती बँकेत जमा करतात थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीप्रमाणे बँकेतील रक्कम हळूहळू वाढत जाते व आपल्या जीवनाच्या वृद्ध अवस्थेत ही रक्कम मोठा आकार घेवून आपल्या जीवनात साकार होते वृद्धपणामध्ये कामविषयाची क्षमता संपुष्टात आलेली असते अशावेळी बँकेत जमा केलेली बचत रक्कम आपल्याला अत्यंत उपयोगी पडते वृध्दपणी सुध्दा आपण दुसऱ्यावर अवलंबून नाही हे समाधान आपल्याला प्राप्त होते म्हणजेच वार्धक्याशी मनाला मजबूतपणा प्राप्त झालेला असतो. त्याच प्रमाणे वेळोवेळी बिकट प्रसंगी पैशाची गरज भासते तेव्हा कोणाकडेही हात न पसरता आपल्याला बँकेकडून पैशाचा पुरवठा होतो थोडक्यात अट्टाहासाने काटकसरीने राहून बँकेत पैसे जमा केल्याने तेच पैसे आपल्याला आपल्या कठीण प्रसंगी उपयोगी पडतात व पैशाविना होणारी आपली मानहानी व अपमान टळतो थोडक्यात पैशासंदर्भात सर्वांना सर्वत्र जो अनुभव येतो तो हा की

गाठी असेल पैसा तर लोक म्हणतील बसा नाही तर लोक म्हणतील पसा
जवळ असेल पैसा तर बहिण म्हणेल दादा नाहीतर हात तंगवून ती करील टाटा
म्हणून जीवनाच्या वाटेत पैशाचे हे विलक्षण महत्व सकल घेणे शहाणपणाचे होय

थोडक्यात सर्व सांगण्याचे तात्पर्य एकच की पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णांनी प्रिय भक्त अर्जुनाला कुरुक्षेत्रावर केलेले मार्गदर्शन हेच सर्वांना त्या जातीस दिशादर्शक व उपयोगी पडते यामध्ये श्रीकृष्णांनी सांगितले आहे कि वाघ अथवा सिंह व मनुष्य हे दोन्ही सजीव जीव आहेत परंतु यामध्ये मानव हा बुद्धिमान प्राणी आहे जर वाघाने उदरनिर्वाहासाठी प्राण्यांची शिकार केली तर त्याला पाप मिळत नाही, जर मनुष्याने ही हत्या केली तर त्याला पाप मिळते म्हणून मनुष्याने अहिंसेचा स्वीकार करावा तसेच आपल्या सर्व जवळील नातेवाईकांवर स्वतःपेक्षा जास्त प्रेम करणे युक्तिचे कारण सर्व जीवांचे हे शरीरेच भिन्न असले तरी सर्वांचा आत्मा हा एकच आहे,त्यामुळे सर्व जीवांवर एकसारखेच प्रेम करावे.

हाताने काम मुखाने नाम व अंत:करणात राम हाच जीवनात आराम मिळविण्याचा राजमार्ग आहे तसेच

## ती चूक

पायल सोमनाथ पवार
(बी.ए.भाग-१)

आयुष्यात एकच चूक केली
ती म्हणजे प्रेम केलं
करायचं नव्हतं पण होऊन गेलं.........

प्रेमात पडायचं नव्हतं पण पडलो
मी तिला पाहताक्षण तिच्यात
गुंतत गेलो मी.........

खरं प्रेम केलं मी
पण ती टाईमपास करून गेली
पण ती कधीच न येण्यासाठी
निघून गेली......

जाऊ दे जे झाले ते झालं
पण परत प्रेमात पडणार नाही
हे मात्र नक्की झालं



## कुणीतरी हवं होतं

कुणीतरी हवं होतं...
मला जवळ घेणार
मी रडत असताना
माझ्यासाठी रडणार
मग माझे डोळे पुसणारं

कुणीतरी हवं होतं...
माझे हट्ट पुरवणार
मी उगीच रुसले
तरी माझा रुसवा काढणार

कुणीतरी हवं होतं...
मला समजून घेणार
मी उदास असताना
मला खळखळून हसवणार

कुणीतरी हवं होतं...
माझ्या आनंदात सामिल होणार
माझ्यासाठीच जीवापाड प्रेम करणार
अन् माझ्यावर जिवापाड प्रेम करणार

खरचं कुणीतरी हवं होतं...
माझ्यावर मनापासून प्रेम करणार



## स्त्री ही एक शक्ती आहे

कु.पल्लवी अशोक शिंदे
(बी.कॉम.भाग-१)

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते देवता

या संस्कृत वाक्याचे एक स्पष्ट होते की ज्या स्त्रीला सन्मान मिळतो तिथे देवता म्हणजेच सुख शांती आणि समाधान वास करते आम्हाला आपल्या भारतीय संस्कृतीवर आस्था आहे.कारण या भारत देशात आर्य-हिंदू संस्कृतीच्या आधीपासून महिलांचा आदर केला जातो.

तसं पहायला गेलं तर महिलांनी आपल्या असाधारण प्रतिभेने आणि कर्तृत्वाने पुन्हा जगाला तोंडात बोटे घालायला लावली आहे. आजची स्त्री कोणत्याही क्षेत्रात पुरुषांपेक्षा कमी नाही माजी.राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील अंतराळवीर कल्पना चावला बॉक्सर मेरी कोम,ऑलिंपिकवीर साक्षी मलिक व पी.व्ही.सिंधू असार अनेक नावे आहेत.ज्या स्त्रीला सर्व संकटावर मात करून स्वत: या नाव उज्ज्वल करतात फक्त त्यांनाच जसा डोक्यावर बसवता का तुम्ही त्या दृष्टीने बघत नाही ? ही गोष्ट माझ्या मनाला सतत टोच पोहचवते.

जिच्यामुळे आज आपण या पृथ्वीवर आलो त्या आईला खरंच किती लोक किंमत देतात. तिची प्रत्येक गोष्ट खरी मानतात ? तिचे प्रत्येक काम ऐकतात ? आई की नाही होकारीला

आज खूप लोक समाजात असे आहेत जे सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कायम तत्पर असतात मग ते पथनाट्य असो या एखादी रॅली त्यामध्ये छाती ठोकून स्त्री वाचवा स्त्री भ्रूण हत्या थांबवा त्यांना त्यांचा हक्क मिळाला पाहिजे असा घोषणा देतात परंतु खरंच ते लोक स्वत:च्या घरात स्त्रियांना घरात अशी स्वतंत्रता देत असतील ?

मी वैयक्तिकरीत्या कुणाचं नाव घेऊ इच्छित नाही परंतु सुशिक्षित उच्च पदांवर विराजमान असणारे लोकपण असा चुकीच्या मार्गाचा अवलंब करतात.

उदा.स्त्री भ्रूण हत्या बलात्कार पिडित महिलांना योग्य न्याय न देणे आणि घरच्या स्त्रीला आपल्या मुठीत ठेवणं आणि असंच कितीतरी.....

आज आपण एकविसाव्या शतकात जगत आहोत तरीही महिलांवरील अत्याचार कमी झालेले नाहीत.आज या देशात महिलांना ५०% आरक्षण आहे. परंतु व्यवहारिकदृष्ट्या त्यांना तो हक्क मिळतो.तो हक्क मिळतो का ? काल परवाचीच गोष्ट म्हणजेच कोपर्डी हत्याकांड त्या नराधमांनी मुलीवर बलात्कार करून तिची हत्या केली हीच का ती स्त्री -पुरुष समानता ?

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो हे खरं आहे पण ते मान्य करणारे पुरुष जगात बोटांवर मोजण्याइतके आहेत. सध्या भारतात पुरुषप्रधान संस्कृती आहे जेव्हा ही नष्ट होईल तेव्हा आपला भारत देश महासत्ताक नाही तर सगळ्यात देशांचा बाप बनेल बाप....!!

कुपोषित मुलांसाठी जीवन वाहून देणारी राणी बंग आदिवासी लोकांसाठी झटणाऱ्या माई सिंधुताई सपकाळ एव्हरेस्ट पार करणारी बचेंद्री पाल आणि कृष्णा पाटील आता ही क्षेत्रात विश्वविख्यात

लिहिता वाचता येत नव्हता असा अशिक्षित मा.अहिल्याबाई चौधरी देखील यश होतात. अशा सर्व देशाला स्वराज्यगिनींना माझा प्रणाम।

या देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर व महाराणी ताराबाई देखील होत्या जर माता जिजाऊ नसत्या तर आमचे शिवराय कुठून आले असते व देवकी नसती तर भगवान श्रीकृष्ण कुठे असते व या जुन्या कथा सोडा पण श्यामची आई नसती तर आमचे परमपूज्य साने गुरुजी कुठून आले असते.

प्रत्येक कवीला हक्क आहे उघडण्याचा
मातीचा वारसा आकाशात विहरण्याचा
फुलत असते या कणात नाही तर एखादी कळी
त्यांच्यासाठी असतो एक किरण सूर्याचा
स्त्री एक श्रद्धा नव्हे ती प्रेरणा आत्मविश्वास
मनस्वीतेचे अतूट बंधन व प्रेमाचे प्रतीक आहे
कोणतीच जागा खाली नसते
कोणतीच वस्तू बिनकारण नसते
प्रत्येक गोष्टीचा एक हेतू असतो
आणि जगण्याचा आपापला अंदाज
अशी तशी प्रत्येक महिलेची एक अपेक्षा असते
की मी स्वतःची स्वतःची ताकदापेक्षा वेगळी
ओळख बनवावी पण ती ओळख बनवायला
गरज असते समाजाच्या सहकार्याची






## आठवण

किती जण आले
किती जण गेले
तुमच्या आठवणींचे घर
कायम मनात राहिले

काही बोलायचे होते
काही ऐकायचे होते
डोळ्यातील अश्रूंना नवे
रूप द्यायचे होते.

चेहऱ्यापेक्षा मनाने मला
तुमच्याजवळ असायचं होतं
स्वप्नापेक्षा तुमच्या कुशीतच
मी तुला जपायचं होतं

पुन्हा एकदा शोधताना
वाट तुझी चुकली
एक कळी फुलण्याआधीच
झाडावर सुकली



## सुटका

जीवंत असता छळले त्यांना
किंमत ना कळली त्यांची।
येतील का ते परतून आता
पुण्यतिथी करतो त्यांची।।

जेव्हा होते हयात पूर्ण
आदर त्यांची ना वाटली
घरात एका राहूनदेखील
मने मनाशी ना जुळली

वृद्ध जीवांची अडचण तेव्हा
भासत होती सर्वांना
मायेचा तो शब्दही नव्हता
मुखातुनी पडला केव्हा।

केवळ परंपरा ती म्हणुनी
आठवण त्यांची झाली
उपरतली आज देवता
कर्तव्यातून सुटका झाली

आता वाट पाहतो दुसऱ्या जन्माची
कुठलेही आई वडील
द्यायला तयार नाही
भिती वाटते त्यांना
जीवनाची वर भरण्याची

## ॥ फॅशन ॥

फॅशनच्या या पोकळ जगात
संस्कृती साडी विसरून गेले
फॅशन म्हणता म्हणता
विदूषक हे होऊन गेले......

टिकली यांची हवेत उडाली
सुंदर कपाळ सफेद झाले
लाडकीचा अवतार पाहून
आई-वडील उदास झाले.....

सुंदर लांब केसांची वेणी
त्याला आता कात्री लागली
हातात एक बांगडी नको
हीच दुःखद बाब झाली

आहे जी देशाची ओळख
ती साडी जडजड वाटली







## ॥ भारत रत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम॥

कु.वैष्णवी सुर्वे
([illegible])

अब्दुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम(जन्म ऑक्टोबर १५ १९३१ तामिळनाडु भारत) यांना डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम ह्या नावाने ओळखले जाते हे भारताचे अकरावे राष्ट्रपती होते.आपल्या साधेपणा कार्यपद्धतीमुळे ते लोकांचे राष्ट्रपती म्हणून लोकप्रिय झाले त्यांचे वडिल रामेश्वरला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीतून धनुष्कोडीला नेण्याआणण्याचा व्यवसाय करीत डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी आपले शालेय शिक्षण रामनाथपुरला पूर्ण केले लहान वयातच वडिलांचे छत्र गमावल्याने डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम गावात वर्तमानपत्रे विकून तसेच अन्य लहान मोठी कामे करून पैसे कमवित व घरी मदत करीत त्यांचे बालपण खूप कष्टात गेले

कुटुंब गरीब,परिस्थिती बिकट
आत्मविश्वासाने दूर केली
अडचणींची वाट

सकारात्मकतेचे बीज रोवून झालले त्यास कार्यक्षमतेने
पारी जिंकले सर्वांस स्वकुंत्वाने
खरी दिसला साधी राहणी

डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांना शाळेत असताना गणिताची विशेष आवड होती नंतर ते तिरूचिरापल्ली येथे सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले तेथे बी.एससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घातला या संस्थेतून एरॉनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा या प्रसिध्द संशोधन संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण

भारत भूमी सांगून जाते
कलाम सरांची गाथा
सर्व संकटांनी टेकविला
त्यांच्या पुढे माथा

अभिमान वाटे साऱ्यांना
असे भारताचे हे सुपुत्र
भारत महासत्ता होणारच
ह्यांनी रेखिले सुंदर चित्र

भारताच्या मनाच्या कुपीत
रत्ने जरी अनेक
तरीही कलाम सरांसारखे
अनमोल रत्न मात्र एकच

असा हुवा अग्निपंखाला आपणा अखेरचा सलाम
सदैव आपल्या मनात असतील आपले तळमळ सर अब्दुल कलाम

सुविचार- स्वप्न ते नाही जे झोपल्यानंतर पडतात तर खरे स्वप्न ते असतात
जे तुम्हाला पूर्ण केल्याशिवाय झोपू देत नाहीत.

Speak Five lines to your self every morning

1. I am the best
2. I can do it
3. God is always with me
4. I am a winner
5. Today is my day

I am not a handsome guy but I can give my hand to some one who needs help

If you fail never give up because F.A.I.L. means
First Attempt In Learning

End is not End if Fact E.N.D means Effort Never Dies



If you get No as an answer
remember No means
Next Opportunity
So let's be positive

जिस दिन हमारी सिग्नेचर ऑटोग्राफ में बदल जाए
मान लिजिए आप कामयाब हो गए।
इस देश के सबसे अच्छे दिमाग क्लास की लास्ट बेंच पर मिल सकते हैं।
मुस्करा कर देखो तो सारा जहां रंगीन है वर्ना भीगी पलकों से तो आईना भी धुंधला नज़र आता है।



Gifal laxman Gawade
Bsc.II

The Great Indian Bustard lies in Shirtgrass plains & deserts in large arid landscapes It is now confined to only eight pockets in 6 indian states Rajasthan, Gujarat,Maharastra,Maddhya Pradesh,Karnataka & Andhra Pradesh The Large Population of about 100 birds (>50%) can be found in Jaisalmer Barmer / Bikaner districts of Rajasthan Where it is the state Bird
Remaining populations number less than 30 birds each
It may be already extinct in Madhya pradesh There are no reliable current estimates from the state.

Significant Threats do the Great Indian Bustard (GIB)

1. Reduction in the extent of undistrubed arid grassland habitat
2. Degradation & distrubance in existing grassland habitat
3. Hunting
4. Lack of importance of natural grassland conservation in plocy law & P.A network due to incorrect perception on ecological value vis'a vis forest
5.Lack of protection for many lekking & nesting sites
6. Lack of co-operation between different departments /stakeholders in G GIB habitats
7. Lack of awarness & support from local communities
8. Live stock overgrazing & feral dogs
9. distrbance by photographer There is now enough anecdotal evidence to show that Photography of the species causes significant disturbance.

What needs to be done immediately to
recover the great Indian Bustard (GIB)

State Governments must secure & fully protect all lekking sites alekking site is a traditional place where males gather to display & attract females If these sites are subjected to distrubance or degradation GIB may not be able to breeze
There are multiple threats to these sites such as industrial development agriculture irrigation & highways, this step needs political will & co-operation by multiple government depart ments & local communites.

2. State Governments must constitute a GIB task force in every GIB state with a

Tejasvi Uttam Mohari
Bsc.II

Defination of Biodiversity

Biodiversity consist of natural resources such as plant, animals, water, air, soil etc.

Biodiversity generally refers to the variety & variability of life on earth Biodiversity typically measures variation at the genetic species & ecosystem level

Terrestrial Biodiversity tends to be greater near the equator which seems to be the result of the warm climate & high primary productivit

Biodiversity is not distributed evenly on earth & is richest in the tropics these tropical forest ecosystems cover less than 10% of eath's surface & contain about 90% of the world species Biodiversity generally tends to cluster in hotspots

Rapid environmental changes typically cause mass extinctions More than 99.9% of all species that ever lived on the earth amounting to the extinct estimate on the number of earth's current species range from 10 milions to 14 million of which about 12 millions have been documented ^ over 86% have not yet been

The total amount of DNA base pairs on earth's is estimates at 5.0x10 37 & weighdts 5 0 billions tonhes.

In July 2016 scientists reported indentifying a set of 355 genes from the last universal common ancestor (LUCA) of all organisms living on earth

Life began on earth five major mass extinctions & several minor events have led to large & suddden drops in biodiversity

The next 400 milions years included repeated mass extinction events.

In the carboniferous rainforest collapsded to a great loss of plant & animals life

The most recent the cretaceous - paleogene extinction event occures 65 milion years ago & has often attracted more attention than others because it resulted in the extinction of the dinosaurs.

There are microbial mat fosils found in 3.48 bilions year old sandstone discovered in western Australia

other early physical evidence of biogenic substance ins graphite in 3.7 billion year old meta-sedimentary rocks discovered in western greenland

The period since the emergence of humans has displayed an ongoing biodiversity reduction & an accompanying loss of genetic diversity The holocene extinction The Holocene extinction the eduction is caused primarily by human impacts particularly habitual destruction human health in a numbers as ways although a few negative effects are studies



Kotale Ruchira shinde
Bsc.II Zoology

Asima Chatterjee (23 sept.1917-22 Nov 2006) Asima Chatterjee was a chemis who is greatly expected for her contributions to organic Chemistry & Phytomedicine she is well known for her developmet of cancer medicine, anti-epileptic & antimalarial drugs she was the first woman to be named adoctor of science by an Indian university she studied at the universit of calcutta & wrote sereveral volumes of work on the medicinal plants of the indian subcontinent she was nominated by the president of india as memner of therajya sabhja she jas inspired women to follow in her footstep & pursue

Dr. Indira Hinduja M.D. Ph.D is Indian Ganecologist Dr. Indira Hinduja delivered Indian's first test tube bay she was pioneered th gamete intra fallopian transfer leading to the birth of indian's fire gift baby she is gynecologist obstetrician & infertility specialist basedin mumbai Dr. Indira Hinduja research gas counted in sereval papers published in national & international medical journals

Dr. Indira Hinduja is pioneers of GIFT gamates intra fallopian transfer tecnique & ad supervised bith of country's first gift baby on 4 jan 1988 prior to that she was also there at KEM hospital on 06 August 1986 wshere first test tube born

Awards

1. Padmashri (2011)
2. Young Indian Award (1981)
3. outstanding Lady citizen of maharastra state Jaycee Award 1987
4. Bharat Nirman Award for Talented Ladies (1994)
5. Dhanvantari Award by the governor of Maharastra (2000)

## ० विश्वशास्त्रज्ञ स्टीफन विल्यम हॉकिंग

प्रो.अनिल माने

स्टीफन विल्यम हॉकिंग हे भौतिकशास्त्रज्ञ आणि विश्वशास्त्रज्ञ होते. ते रॉयल सोसायटी ऑफ आर्टसचे मानद सदस्य होते.त्यांची पुस्तके आणि जाहीर कार्यक्रम यांनी त्यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली.स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी १९४२ या दिवशी ऑक्सफर्ड लंडन (इंग्लंड)येथे झाला त्यांचे वडील डॉ. फ्रँक हॉकिंग ऑक्सफर्डशी वैद्यकीय संशोधन सचिव होते हॉकिंग यांच्या जन्माच्या वेळी डॉ.फ्रँक आणि इझाबेल या दांपत्याने उत्तर लंडनहून ऑक्सफर्डला स्थलांतर केले कारण त्यावेळी दुसरे महायुद्ध च सुरू होते. त्यांची घरची परिस्थिती बेताचीच होती.लहानपणी हॉकिंग यांना वाचनाची खूप आवड होती. स्टीफन यांच्या जन्मानंतर हॉकिंग कुटुंबाने परत लंडनला स्थलांतर केले गणिताच्या शिक्षकांच्या प्रेरणेमुळे त्यांना विद्यापीठात गणिताचे शिक्षण घ्यायचे होते पण त्यांच्या वडिलांना असे वाटत कि त्यांनी युनिव्हर्सिटी कॉलेज ऑक्सफर्ड विद्यापीठातून पदवी संपादन केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी स्टीफन यांनी केंब्रिज विद्यापीठ येथे प्रवेश घेतला केंब्रिज विद्यापीठात ३० वर्ष त्यांनी गणिताचे अध्यापन केले आहे.

विश्वशास्त्र (कॉस्मॉलॉजी) आणि पुंज गुरू त्व (क्वांटम ग्रॅव्हिटी) या दोन शाखांमध्ये कृष्णविवरांच्या संदर्भाने त्यांनी दिलेले योगदान गौरविले जाते.कृष्णविवरेही किरणोत्सर्ग करीत असतात हे त्यांचे सैद्धांतिक अनुमान प्रसिद्ध आहे.ब्रिफ हिस्टरी टाईम त्यांच्या ग्रंथाने जगभरात लोक प्रियता मिळवली सन २००९ मध्ये त्यांना प्रेसिडेन्शीअल मेडल फॉर फ्रिडम या अमेरिकेतील सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले गेले.

१९६२ मध्ये दिवाळी सुट्टयासाठी स्टीफन आपल्या घरी गेले असता त्यांना अचानक त्रास होऊ लागला ८ जानेवारी १९६३ रोजी २१ वा वाढदिवस साजरा करीपर्यंत त्याच दिवशी स्टीफन यांना एक असाध्य रोग झाल्याचे स्पष्ट झाले या रोगाला इंग्लंडमध्ये मोटर न्यूरॉन डिसीज (एमएनडी) असे म्हणतात

If I had to Choose a superhero to be
I would like pick superman He's everything
that I am not and he is a step





प्रो.अनिल माने

God is the name people give to the reason we are here


work gives you meaning and purpose and life is empty without it

There is nothing bigger or older than the universe

Intelligence is the ability to adapt to change

The past like the future is indefinite and exists
only as a spectrum of possibilities

Thank you, Mom
Thank you, Dad
Three small Words
So much to add
for all your love
and your support
a million words
would be too short
The words I love you "
Seem too few
to express the love
I have for you



Life is a challenge - Meet it
Life is a gift - accept it
Life is a sorrow - over come it
Life is a tragedy - Face it
Life is a promise - complete it
Life is a goal - achieve it
Life is a love - love it
Life is a duty - perform it
So Life is a great make something good of it

## ॥ स्वप्न ॥

मुजावर आफताब
(बी.ए.भाग-१)

प्रत्येकाचं स्वप्न असत
कुणाचं अपुर्ण राहत , तरं
कुणाचं मेल्यानंतर ही पुर्ण होतं
स्वप्न, भिकाऱ्याला सुध्दा राजा बनवतो.

मनातलं वास्तवात करता येत नाही
म्हणून देवानं त्याला स्वप्नाच्या स्वरूपात दिलं
ही देवाची एक अमूल्य लेणंच
स्वप्न,पंख नसतानाही वाऱ्यात उडवणारं

पाहिलेलं स्वप्न असतात प्रत्येकाचे
त्याला सत्यात उतरवायचं असतं
त्यासाठी रात्रं-दिवस खूप कष्ट करायचं असतं
स्वप्न,आशेचा एक किरण.....

असाध्य गोष्ट शक्य करते स्वप्न,
भिकाऱ्याला व राज्याला येणारं
त्याला स्वप्नाची स्वप्नपुर्तीसाठी करा खूप प्रयत्न
स्वप्न,मनातल्या इच्छेचं एक दुसर नावचं....स्वप्न

## ॥१२ व्या शतकातील हरवलेले बालपण..॥

तंत्रज्ञानाच्या युगा विश्वात आपण आलो.
खेळा-खेळा नातं दूर करत आलो.
कुठे आईस,पैसेमिळवीच, लंगडाचाच ,विटकरचं.....

टेक्नोलॉजीच्या जगात स्वत:च्या बाळाला
सांभाळायला लागतो दुसरी माय
स्वत:च्या मुलांना आजकाल पाहत येत नाय......

जीवलग मित्रांना भेटणे होत नाही आता सकाळ पण व्हाट्सअॅप व फेसबुक ,मेसेंजर वापरून होत असल्याने भेट घेण्यासाठी नाही वेळ, सणासुदीला,म्हणतात ये ऑनलाईन करून व्हिडीओ कॉल

खो-खो ,कबड्डी मातीतल्या मैदानी खेळ राहिला आता फक्त
पुस्तकीच,पण आता आल्या क्रिकेट,पबजी, लुडो सारख्या गेम

मिळत नाही आताच्या पैसेतल्या त्या पत्राचा स्वाद भेट -इंटरनेट वाने लावून टाकली बाट २१ व्या शतकात आपलेआप दूर होत गेली ती





## ॥ स्त्री जन्माचे स्वागत करा ॥

कु.शितल लहू खताळ
(बी.कॉम भाग-१)

छोट्या या आयुष्यामध्ये
खूप काही हवे असते
मुलीच्या जन्म झाला नसता
तर जगणे सुध्दा कठिण झाले असते.

आईच्या पोटात गर्भावस्थेत मुली मारून टाकण्याच्या विकृत हिंसक संवेदनशील आणि अन्यायकारक वाला भारताने ग्रासलेले आहे,स्त्रीभ्रूण जन्म नाकारणे ही आधुनिकयुगातील,विज्ञान युगातील सर्वात क्रूर आणि वाईट कृती आहे या ज्वलंत समस्येने गंभीर स्वरूप धारण केलेले आहे.आज सर्वत्र क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे पण आपल्यावर होणारा अन्याय ती निमुटपणे का सहन करते ! स्त्रीभ्रूण हत्येला ती का तयार होते ती विरोध का करीत नाही याचाच अर्थ पुरुषाच्या विचारांचा बहुतांश प्रभाव स्त्रीयांच्या विचारसरणीवर आहे.

जन्माला येण्याअगोदर कन्यारत्नाचा बळी घेतला जातो स्त्रीजर स्वतंत्र विचाराची असती तर ति स्वत:च्या पोटात वाढणाऱ्या अंकुर नष्ट करण्याचा विचारही कधीने केला नसता उलट त्याला विरोध केला असता. आज समाजात चित्र व चित्र दिसत आहे का सुशिक्षित स्त्री सुध्दा पाप करण्यात सहभागी असल्याच्या दिसतात मग काय मिळवा शिक्षणाचा उपयोग फायदा मुलगी असो की मुलगा दोघी समान आहेत असा विचार करायला हवा .जोपर्यंत प्रत्येक स्त्रीमध्ये ही भावना रूजत नाही तो पर्यंत आपण स्वत:ला सुशिक्षित सुविचारी सुसंस्कृत कसं म्हणून घेऊ शकतो एवढीही क्षत नाही की ति

मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी


स्त्री स्त्रीभ्रूण हत्येला तयार का होते याचे कारण म्हणजे मुलगा वंशाचा कुलदिपक समजला जातो त्यांना समजल पाहिजे की मुलगी जरी वंशाचा दिवा असला तरी मुलगी ही त्या दिव्याचीपणती होण्याचे काम करते

ओवाळायला बहीण हवी, माया करायला आई हवी
मुलाला मुलगी म्हणून पत्नी हवी तर मुलगी का नको

स्त्रीभ्रूण हत्या जेव्हा थांबवू शकते की जेव्हा त्यांच्या परिवाराच्या विचारसरणीमध्ये बदल करायला पाहिजेत. त्यानांना समजवायला पाहिजे की मुलगी व मुलगा हे दोन्ही समान आहे त्यांना समान प्रकारची वागणूक दिली पाहिजे मुलाला जेवढ्या प्रकारची मोकळीक व स्वांतत्र्य तेवढेच मुलीला दयायला पाहिजे.

त्या प्रत्येक स्त्रीला समजले पाहिजे स्त्रीभ्रूण हत्या करणे म्हणजे आपल्या स्वत:च्या हातांनी आपला व एका स्त्रीचा अपमान करणे होय प्रत्येक स्त्रीने आपला परिवाराच्या व स्व:च्या विचारात बदल केला तरच स्त्रीभ्रूण हत्या थांबवता येईल,

म्हणूनच म्हणे आता तरी विचार बदला वंशाचा दिवा करा कोण तुम्ही ओळख्या स्त्री असो या पुरुष जन्म तर स्त्रीच्याच पोटी घ्यावा लागतो आईशिवाय कशाला हवी सांगायला घरात हवा होऊया स्त्री



# संवेदना सभा



◎ पी.पी.टी प्रस्तुतिकरण स्पर्धा ◎






◎ राज्यशास्त्र विभाग-भारतीय संविधान ◎




॰ युवा महोत्सव ॰




॰ स्व संरक्षण कार्यशाळा ॰









जागतिक साक्षरता दिन

* इतिहास विभाग सहल *





* इतिहास विभाग सहल *





* इतिहास विभाग सहल *



